❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती रविवार, दि. १५ नोव्हेंबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : ३१८ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



संस्थांच्या 'फी'वर सरकारचे नियंत्रण

'FRA' कायद्यात होणार मोठे बदल; वाढत्या शुल्कातून विद्यार्थ्यांना मिळणार मोठा दिलासा

■ मुंबई (दै. संध्या)

गोकुळच्या निकालानंतर काँग्रेस नेते सतेज पाटील यांच्यासह राज्यातील बड्या संस्थाचालकांच्या मनमानी नफेखोरीला आणि अवाढव्य फी वसुलीला चाप लावण्यासाठी राज्य सरकार सज्ज झाले आहे. यासाठी सरकार एफआरए (FRA - शुल्क नियामक प्राधिकरण) कायद्यात महत्त्वाचे बदल करून सर्व शैक्षणिक संस्थांच्या फीवर थेट नियंत्रण आणणार आहे. उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी एका वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात बोलताना या नव्या निर्णयाची घोषणा केली. सरकारच्या या महत्त्वपूर्ण पावलामुळे विद्यार्थ्यांवरील वाढत्या शैक्षणिक शुल्काचा भार कमी होण्यास मोठी मदत होणार आहे. राज्यात 2015 साली लागू झालेल्या सध्याच्या एफआरए कायद्यानुसार राज्य सरकारला शैक्षणिक संस्थांच्या फी वसुलीवर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार प्राप्त झाले आहेत. या कायद्याच्या कक्षेत सध्या सर्व शासकीय विद्यापीठे, अनुदानित महाविद्यालये आणि स्वायत्त महाविद्यालये येतात. या संस्थांनी भरमसाठ फी आकारल्यास त्यांच्या कारभाराची



चौकशी (इन्स्पेक्शन) करण्याचा आणि त्यांच्यावर कठोर कारवाई करून फी नियंत्रणात ठेवण्याचा पूर्ण अधिकार एफआरएच्या माध्यमातून राज्य सरकारला आहे.

मात्र, अलीकडच्या काळात राज्यात अनेक खाजगी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे आणि क्लस्टर (समूह) विद्यापीठे नव्याने निर्माण झाली असून त्यांना सध्याचा एफआरए कायदा लागू होत नाही. ही विद्यापीठे पब्लिक ट्रस्टच्या अंतर्गत येत असली तरी, त्यांना खाजगी दर्जा मिळाल्यामुळे त्यांच्या स्वतःच्या समित्या फी ठरवतात आणि सरकारचे त्यांच्यावर कोणतेही नियंत्रण राहत नाही. याच कायदेशीर त्रुटी दूर करून आता या सर्व खाजगी, अभिमत आणि समूह विद्यापीठांनाही सरकारच्या कक्षेत आणण्यासाठी आणि त्यांच्या फीवर थेट अंकुश ठेवण्यासाठीच एफआरए कायद्यात हा नवा बदल केला जात आहे.

चंद्रकांत पाटील म्हणाले की, विद्यार्थी आणि पालकांची आर्थिक पिळवणूक थांबवण्यासाठी खासगी विद्यापीठांच्या शुल्कावर अंकुश ठेवणे आवश्यक आहे. लवकरच समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर विधीमंडळात कायदा दुरुस्तीचे विधेयक मांडून सर्व सेल्फ फायनान्स विद्यापीठांचे शुल्क एफआरएच्या नियंत्रणाखाली आणले जाईल. या प्रक्रियेचे अधिकृत अपडेट्स तुम्ही महाराष्ट्र शुल्क नियामक प्राधिकरणाच्या (FRA) वेबसाइटवर तपासू शकता.

सुप्रीम कोर्टाचे स्पष्ट निर्देश: टी.एम.ए. पै फाउंडेशन (2002), इस्लामिक अकादमी ऑफ एज्युकेशन (2003) आणि पी.ए. इनामदार (2005) या ऐतिहासिक खटल्यांमध्ये सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले की, खासगी शिक्षण संस्थांना स्वतःची फी ठरवण्याचा अधिकार आहे. मात्र त्यांना शिक्षणाचे व्यापारीकरण किंवा नफेखोरी करता येणार नाही.

प्राधिकरणाची सक्ती: फी नियंत्रणासाठी प्रत्येक राज्याने एक स्वतंत्र समिती किंवा प्राधिकरण नेमावे, असे आदेश कोर्टाने दिले.

महाराष्ट्राचा 2015 चा कायदा: सुप्रीम कोर्टाच्या आदेशांचे पालन करत महाराष्ट्र सरकारने 'महाराष्ट्र विनाअनुदानित खासगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क नियमन) अधिनियम, 2015' लागू केला. यातूनच राज्यात 'शुल्क नियामक प्राधिकरण' (FRA) स्थापन करण्यात आले.

एफआरएची (FRA) कार्यपद्धती: हे प्राधिकरण अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि व्यवस्थापन यांसारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या खर्चाचा सविस्तर आढावा घेते आणि प्रत्येक शैक्षणिक संस्थेसाठी कमाल फी निश्चित करते.

विद्यार्थी-पालकांचा सहभाग: फी वाढवण्याचा निर्णय घेण्यापूर्वी विद्यार्थी आणि पालकांचे म्हणणे ऐकून घेण्याची योग्य यंत्रणा असावी, असेही सुप्रीम कोर्टाने 2017 च्या निर्देशांमध्ये स्पष्ट केले आहे.

मुंबईकरांच्या खिशाला कात्री !

रिक्षा-टॅक्सीचा प्रवास महागणार, महानगर गॅसकडून CNG दरात वाढ; मध्यरात्रीपासून नवे दर लागू

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यात एकीकडे महागाईचा भडका उडालेला असतानाच आता मुंबईकरांच्या खिशावर आणखी एक मोठा भार पडणार आहे. महानगर गॅस लिमिटेडने मुंबई आणि लगतच्या परिसरात सीएनजीच्या दरात प्रति किलो 1.50 रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. या दरवाढीनंतर आता मुंबई आणि आसपासच्या भागात सीएनजीचा नवा दर प्रति किलो 91.50 रुपये इतका असणार आहे. हे सुधारित दर 14 नोव्हेंबरच्या मध्यरात्रीपासून लागू होणार आहेत. या निर्णयाचा थेट फटका रिक्षा, टॅक्सी चालक आणि खासगी सीएनजी वाहनधारकांना बसणार आहे. महानगर गॅस लिमिटेडने या दरवाढीमागील कारणे स्पष्ट करणारे अधिकृत निवेदन जारी केले आहे. सध्या सुरू असलेल्या पश्चिम आशियातील तणाव आणि संकटामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात गॅसचे दर भडकले आहेत. देशांतर्गत गॅस वाटपात कपात झाल्यामुळे महागड्या आयात केलेल्या आरएलएनजी गॅसवरील अवलंबित्व वाढले आहे. तसेच एकूण पुरवठ्यात आयात गॅसचा वाटा वाढल्याने महानगर गॅस लिमिटेडच्या (MGL) खरेदी खर्चात मोठी वाढ झाली आहे. या खर्चाची अंशतः भरपाई करण्यासाठी आणि ग्राहकांना



अखंड पुरवठा सुरू ठेवण्यासाठी ही दरवाढ करणे अपरिहार्य ठरल्याचे कंपनीने त्यांच्या निवेदनात म्हटले आहे. विशेष म्हणजे, मुंबईपूर्वी राज्यातील पुणे, नाशिक आणि धुळे जिल्ह्यातही सीएनजी आणि घरगुती पाईप गॅसच्या (PNG) किमतीत मध्यरात्रीपासून वाढ करण्यात आली आहे. या शहरांमध्ये सीएनजीचे दर प्रति किलो 1.25 रुपयांनी, तर पीएनजीचे दर प्रति घनमीटर 1.50 रुपयांनी वाढले आहेत.

दरवाढीनंतर राज्यातील प्रमुख शहरांतील नवे दर खालीलप्रमाणे आहेत:

मुंबई आणि आसपासचा परिसर: CNG दर प्रति किलो 91.50 रुपये (1.50 रुपयांची वाढ).

पुणे: CNG दर प्रति किलो 99.00 रुपये, तर PNG दर प्रति घनमीटर 53.00 रुपये.

नाशिक: CNG दर प्रति किलो 99.75 रुपये, तर PNG दर प्रति घनमीटर 51.75 रुपये.

थोडक्यात...

दादांच्या पुतळ्याचे शहा यांच्या हस्ते अनावरण

पुणे : दैनिक संध्या

'पुणे जिल्ह्याच्या विकासातील दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या योगदानाचे स्मरण म्हणून जिल्हा परिषदेच्या वतीने उभारण्यात आलेल्या त्यांच्या पुतळ्याचे अनावरण सोमवारी (ता. १६) केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर त्यांच्या हस्ते नेहरू मेमोरियल हॉल येथे दुपारी बारा वाजता अजित पवार यांच्या कार्यावरील कॉफीटेबल बुकचे प्रकाशन आणि लघुपट प्रदर्शित करण्यात येणार आहे,' अशी माहिती जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिली. पत्रकार परिषदेप्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, सभापती दीपाली हुलावळे, जितेंद्र बडेकर, अमोल नलावडे आदी उपस्थित होते. दरम्यान, या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित राहणार आहेत. जगदाळे म्हणाले, 'जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासात अजित पवार यांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या कार्याचे कायम स्मरण राहावे आणि त्यातून लोकसेवेची प्रेरणा मिळावी, या उद्देशाने पुतळ्याची उभारणी करण्यात आली आहे. हे स्मारक लोकसेवेसाठी समर्पणाची शिकवण देणारे ठरेल.' तर पाटील म्हणाले, 'अजित पवार यांनी प्रशासनाला लोकाभिमुख करण्याला प्राधान्य दिले. कोणतेही काम करताना सर्वसामान्य जनतेला केंद्रस्थानी ठेवले पाहिजे, ही शिकवण आम्हाला त्यांच्याकडून मिळाली. त्यांची ही शिकवण कायम स्मरणात ठेवण्यासाठी हे स्मारक प्रेरणादायी ठरेल.'

पालकमंत्र्यांचा ताफा अडकताच पोलिसांना जाग!

महूद : दैनिक संध्या

महूदच्या मुख्य चौकातील वाहतूक कोंडीत पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा वाहनांचा ताफा सोमवारी (ता. ९) तब्बल अर्धा ते पाऊण तास अडकल्यानंतर सांगोला पोलिस प्रशासनाला जाग आली आहे. चौकातील अनधिकृत अतिक्रमणे आणि होर्डिंग हटविण्याबाबत पोलिसांनी पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना पत्र दिले आहे. त्यामुळे अतिक्रमणांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, प्रत्यक्ष कारवाई होणार की केवळ पत्रव्यवहारावरच समाधान मानले जाणार, याकडे महूदकरांचे लक्ष लागले आहे. जत-मुंबई राष्ट्रीय महामार्ग आणि पंढरपूर- मल्हारपेठ राज्य महामार्गाच्या मध्यवर्ती ठिकाणी महूदचा मुख्य चौक आहे. मात्र, दोन्ही मार्गांवरील वाहतुकीच्या तुलनेत चौकातील रस्ते अरुंद असल्याने येथे नेहमीच कोंडी होते. वारी, सण-उत्सवांच्या काळात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. सोमवारी दिवाळीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या कोंडीत पालकमंत्र्यांचा ताफाही अडकला.

गणेश नाईक नक्की भाजपचेच आहेत का?

त्यांचा DNA तपासला पाहिजे, आमदार मंदा म्हात्रेंची सडकून टीका

■ नवी मुंबई (दै. संध्या)

नवी मुंबईत भाजपमधील अंतर्गत कलह समोर आला आहे. आमदार मंदा म्हात्रे यांनी भाजपचे नेते आणि मंत्री गणेश नाईक यांच्यावर सडकून टीका केली आहे. वनमंत्री गणेश नाईक यांचा डीएनए चेक करायला पाहिजे, ते नक्की भाजपाचे आहेत का? असा सवाल आमदार मंदा म्हात्रे यांनी केला. दरम्या, मंदा म्हात्रे यांनी केलेले आरोप गणेश नाईक समर्थकांनी फेटाळले आहेत. वनमंत्री गणेश नाईक आणि आमदार मंदा म्हात्रे या दोघांमधून विस्तव जाता जात नाही. नवी मुंबईकरांच्या गरजेची असलेली शहरातील अनेक कामे मी आमदार म्हणून मंजूर करून आणल्यानंतर त्याला विरोध करायचे काम येथील भाजपाचे नेते करीत आहेत. रुग्णालय, लायब्ररी, मरिना सेंटर, स्टेडियम अशी शहरवासीयांसाठी गरजेची कामे सरकारकडून मंजूर केली आहेत. यासाठी करोडो रुपयांचा निधी आणला आहे . याला विरोध करून ती कशी होणार नाहीत याची काळजी नवी मुंबईतील भाजपाचे नेते गणेश नाईक घेत आहेत अशी टीका भाजप आमदार मंदा म्हात्रे यांनी केली आहे. भाजप आमदारांच्या कामाला भाजपचा मंत्री विरोध करत असल्याने हे नक्की भाजपाचे आहेत का? यांची डीएनए टेस्ट करायला पाहिजे असा गंभीर आरोप आमदार मंदा म्हात्रे यांनी केला आहे. दरम्यान मंदा म्हात्रे



यांचे आरोप गणेश नाईक समर्थक नगरसेवकांनी फेटाळले आहेत. काही तांत्रिक गोष्टीमुळे कामे मंजूर होण्यास विलंब होत असल्याचे त्यांच्याकडून स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसापासून नवी मुंबईमध्ये भाजपमध्ये अंतर्गत कलह असल्याचे दसून येत आहे. वनमंत्री गणेश नाईक आणि भादप आमदार मंदा म्हात्रे यांच्यात सगळे काही ठिक असल्याचे दिसत नाही. दोन्ही राजकीय नेते ऐकमेकांवर टीका करत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. यामुळं भाजपच्याच दोन नेत्यांमध्ये नवी मुंबईत संघर्ष होताना दिसत आहे. त्यामुळं तेथील राजकीय वातावरण तापल्याचं पाहायला मिळत आहे. मंदा म्हात्रे यांनी गणेश नाईकांवर आरोप करत जोरदार हल्लाबोल केला आहे. नवी मुंबईकरांच्या गरजेची असलेली शहरातील अनेक कामे मी आमदार म्हणून मंजूर करून आणल्यानंतर त्याला विरोध करायचे काम येथील भाजपाचे नेते करीत आहेत.

सध्या विलिनीकरणाच्या कोणत्याही चर्चा नाहीत : लंके



■ अहिल्यानगर (दै. संध्या)

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्षा आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाच्या चर्चांना पूर्णविराम दिला आहे. गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाच्या चर्चांनी जोर धरला होता. मात्र, सुप्रिया सुळे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडून विलिनीकरणाच्या चर्चांना ब्रेक लावण्यात आला आहे. या घडामोडींबाबत अहिल्यानगर दक्षिणचे खासदार निलेश लंके यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलिनीकरणाच्या चर्चांवर भाष्य केलं आहे.

खासदार निलेश लंके म्हणाले की विलिनीकरणाच्या केवळ चर्चा आहेत. आमच्यापर्यंत अशा कोणत्याही गोष्टी आतापर्यंत तरी आलेल्या नाहीत. आमचा नेता खंबीर आहे, त्यांच्या नेतृत्वाखाली आम्ही काम करतो. त्यामुळे आम्ही अशा चर्चांमध्ये सहभागी होत नाही. ते जो निर्णय घेतील त्यासोबत आम्ही आहोत मात्र सध्या तरी अशा कोणत्याही चर्चा झालेल्या नाहीत, असं निलेश लंके यांनी म्हटलं. राजकारणात बऱ्याच गोष्टी प्रत्यक्ष काय घडतं यापेक्षा चर्चा जास्त होत असतात. विलिनीकरणाबाबत वेगवेगळ्या चर्चा आम्हाला पाहायला मिळाल्या. आमच्यासमोर अशा प्रकारची चर्चा झालेली नाही. आम्ही शरद पवार यांच्या नेतृत्त्वात काम करतोय. आमच्यासमोर दुष्काळाचा प्रश्न आहे. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांना आधार दिला पाहिजे, ही भावना महत्त्वाची आहे. आम्हाला काय वाटतं यापेक्षा कुटुंबप्रमुख ज्यावेळी सक्षम असतो तेव्हा आपण चर्चा करण्याला अर्थ नसतो, असं निलेश लंके म्हणाले. सुप्रिया सुळे यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेत भूमिका मांडली. माझा भाऊ होता तोपर्यंत विलिनीकरण होणार होते, तारीख ठरली होती. ज्या दिवशी माझा भाऊ गेला त्यानंतर पूर्णविराम झाला. आमच्याकडून एका नेत्यानं पण स्टेटमेंट केले नाही. कोणी बोलले नाही जे जे स्टेटमेंट आले त्यात एकालाही काऊंटर केले नाही, असं सुप्रिया सुळे यांनी म्हटलं. याशिवाय विलिनीकरणाच्या चर्चांचा मला कंटाळा आलाय, असंही त्या म्हणाल्या.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे मार्ग सध्यातरी वेगळे राहणार असल्याचं चित्र पाहायला मिळतंय. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार प्रफुल पटेल यांनी शरद पवारांची ब्रीच कँडी रुग्णालयात भेट घेतल्यानंतर दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाची चर्चा सुरु झाली होती. त्यानंतर पक्षाचे महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष आणि खासदार सुनील तटकरे यांनी 12 फेब्रुवारीला दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचं विलिनीकरण होणार होतं, असं म्हटलं होतं. विशेष म्हणजे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर सुनील तटकरे यांनी विलिनीकरणाच्या चर्चा नाकारल्या होत्या.

केंद्रात सत्तेत जाण्याची चर्चा नाही

शरद पवार साहेब, सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, जयंत पाटील हे सक्षम नेतृत्त्व करणारी माणसं आहेत. त्यामुळं आम्ही या चर्चांमध्ये सहभागी होण्याचा प्रयत्न करत नाही. आताच्या परिस्थितीत शेतकरी अडचणीत आहे, त्यांना मदत मिळवून दिली पाहिजे, त्यांना आधार दिला पाहिजे हे आमच्यासाठी महत्वाचं आहे. केंद्रात सत्तेत जाण्याबाबत देखील कोणत्याही प्रकारची चर्चा झालेली नाही, अशा चर्चा केवळ घडवून आणल्या जात असल्याचं निलेश लंके यांनी म्हटलं आहे.

गोध्रा कांडावर सोनिया गांधींचा दावा राकेश अस्थानांनी फेटाळला


१४० लिटर पेट्रोल टाकून साबरमती एक्सप्रेस पेटवल्याचा दावा, गुजरात दंगलीचा घटनाक्रम सांगितला

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

गोध्रा हत्याकांडाला 24 वर्षे पूर्ण झाली असली तरी साबरमती एक्सप्रेसला लागलेल्या आगीवरून आजही देशात राजकारण तापताना दिसत आहे. काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्या सोनिया गांधी यांनी त्यांच्या 'Belonging: A Journey of Love' या पुस्तकात पान क्रमांक 401 ते 403 दरम्यान 2002 मधील गोध्रा ट्रेन अग्निकांड आणि त्यानंतर झालेल्या गुजरात दंगलींवर भाष्य केले आहे. या पुस्तकामध्ये सोनिया गांधींनी ट्रेनमधील आगीचे कारण अजूनही 'विवादित' असल्याचं म्हटलं आहे.

सोनिया गांधींच्या या वक्तव्यावर आता या प्रकरणाचा तपास करणाऱ्या गुजरात पोलीस एसआयटीचे (SIT) तत्कालीन प्रमुख आणि माजी आयपीएस अधिकारी राकेश अस्थाना (Rakesh Asthana) यांनी मौन सोडलं आहे. "आगीचे कारण विवादित असल्याचे म्हणणे पूर्णपणे चुकीचे आहे. ही आग कोणत्याही अपघाताने नव्हे, तर पूर्वनियोजित कटातून लावण्यात आली होती," असं राकेश अस्थाना यांनी ठामपणे सांगितलं आहे.

ANI ला दिलेल्या मुलाखतीत सीबीआयचे माजी विशेष संचालक राकेश अस्थाना यांनी तपासाचे सर्व तपशील समोर ठेवले. ते म्हणाले की, हा संपूर्ण खटला फॉरेन्सिक पुरावे, प्रत्यक्षदर्शींच्या साक्षी, काही आरोपींचे कबुलीजबाब आणि जळालेल्या डब्याच्या सखोल तपासावर आधारित होता. "सरकारी पक्षाची बाजू केवळ कबुलीजबाबावर अवलंबून नव्हती, तर भक्कम



फॉरेन्सिक पुरावे आणि स्वतंत्र साक्षीदारांच्या आधारेच ट्रायल कोर्ट आणि गुजरात हायकोर्टात आरोपींना दोषी ठरवून शिक्षा सुनावली गेली," असेही अस्थाना यांनी स्पष्ट केले.

राकेश अस्थाना यांनी 2002 मधील त्या काळ्या दिवसाचा संपूर्ण घटनाक्रम सांगताना धक्कादायक माहिती दिली. सकाळी 8 वाजून 10 मिनिटांनी ट्रेन प्लॅटफॉर्मवरून पुढे सरकताच 3 ते 4 डब्यांतून एकाच वेळी चेन पुलिंग करण्यात आली. ट्रेन पुन्हा सुरू झाल्यावर अर्धा किलोमीटर अंतरावर व्हॅक्यूम की फिरवून 4 डब्यांची चेन पुलिंग करून ट्रेन 'सिग्नल फलिया' परिसरात थांबवण्यात आली. ट्रेन जिथे थांबली तिथे आधीच 150 ते 200 लोकांचा जमाव उभा होता आणि त्यातील 20 ते 25 तरुणांनी पेट्रोल जमा करून ठेवले होते.

हल्लेखोरांनी S-6 आणि S-7 डब्यांमधील कॅनव्हासचे वेस्टिब्यूल कापले. प्रवाशांनी दगडफेकीमुळे दरवाजा आतून बंद केला होता, मात्र काहींनी दरवाजा ढकलून आत प्रवेश केला आणि तब्बल 140 लिटर पेट्रोल डब्यात ओतून बाहेर उडी मारली. बाहेर उभ्या असलेल्या जमावाने दगडफेकीत फुटलेल्या खिडक्यांमधून आत पेटत्या मशाली फेकल्या. अवघ्या 5 मिनिटांत संपूर्ण S-6 डबा आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. या भीषण घटनेत 27 महिला, 10 मुले आणि 22 पुरुष अशा एकूण 59 जणांचा होरपळून मृत्यू झाला होता. सोनिया गांधी यांनी आपल्या पुस्तकाच्या पान क्रमांक 403 वर लिहिलं आहे की, अयोध्येतून अहमदाबादला परतणाऱ्या साबरमती एक्सप्रेसच्या डब्यांना आग लावल्यानंतर 2002 च्या दंगली भडकल्या होत्या, ज्यात राम मंदिराच्या स्वयंसेवकांसह 59 यात्रेकरूंचा मृत्यू झाला. या आगीची कारणे आजही विवादित आहेत, मात्र या घटनेनंतर संपूर्ण राज्यात हिंसाचार पसरला ज्याचे मुख्य बळी मुस्लिम ठरले, असे सोनिया गांधींनी आपल्या पुस्तकात नमूद केले आहे.

सोनिया गांधींचे दावे निराधार ठरवत राकेश अस्थाना पुढे म्हणाले की, जे प्रवासी जीव वाचवण्यासाठी डब्यातून बाहेर उड्या मारत होते, त्यांनाही जमावाने पाठलाग करून मारहाण केली. सकाळीच जमाव गोळा होणे, पेट्रोल साठवणे आणि 'अमन गेस्ट हाऊस'मध्ये बैठक घेऊन नियोजन करणे, हा अपघात कसा असू शकतो? या गेस्ट हाऊसचा मालक रज्जाक कुरकुर हा देखील मुख्य सूत्रधारांपैकी एक होता, असे त्यांनी नमूद केले.

तुम्हाला मजूर नव्हे, भागीदार बनवायचेय

■ हैदराबाद (दै. संध्या)

राहुल गांधी शनिवारी हैदराबादमध्ये गिग कामगारांच्या रॅलीत सहभागी झाले. ते एका महिला रायडरच्या मागे बसले आणि तिच्याशी संवाद साधला. यावेळी त्यांनी म्हटले, 'भाजप-आरएसएसला गिग कामगारांना वेठबिगार बनवायचे आहे. तुमच्याकडून २४ तास काम करून घेऊन अंबानी-अडाणींसारख्या अब्जाधीशांना फायदा मिळवून द्यायचा आहे. तर काँग्रेसला तुम्हाला कामगार नव्हे, तर भागीदार बनवायचे आहे.' तेलंगणा विधानसभेत गिग कामगार कायदा २ जून रोजी लागू झाला होता. त्यानंतर त्यांना अनेक सुविधा दिल्या जात आहेत. गिग कामगारांसाठी कायदा बनवणारे राजस्थान हे पहिले राज्य आहे. याशिवाय, कर्नाटक, बिहार आणि झारखंडमध्येही हा कायदा लागू करण्यात आला आहे. राहुल गांधींनी सांगितले की, अपघात किंवा आजारपणामुळे कामगारांना आणि त्यांच्या कुटुंबांना मोठ्या संकटांचा सामना करावा लागू शकतो. यावर उपाय म्हणून, तेलंगणा सरकार प्रत्येक 'गिग वर्कर'ला (प्लॅटफॉर्मवर काम करणाऱ्या कामगारांना) ५ लाख रुपयांचा अपघात विमा आणि १० लाख रुपयांचा आरोग्य विमा देणार आहे. त्यांनी पुढे सांगितले की, प्रत्येक राईड किंवा डिलिव्हरी व्यवहारातून मिळणाऱ्या कमाईपैकी १% रक्कम कामगारांच्या भविष्यासाठी थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केली जाईल. ही रक्कम कंपन्यांना देणे बंधनकारक असेल. राहुल गांधींनी नमूद केले की, तेलंगणातील शहरांमध्ये 'गिग वर्कर्स' दिवसभर कडक उन्हात स्कूटरवरून काम करतात, परंतु त्यांना विश्रांती घेण्यासाठी कोणतीही योग्य जागा उपलब्ध नसते.

संपादकीय

घरात ठेवलेल्या सोन्याचा हिशोब द्यावा लागणार?

घरात सोने बाळगण्याच्या मर्यादेबाबत सर्वोच्च न्यायालयाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दूरगामी परिणाम करणारा निर्णय दिला आहे. आयकर विभागाच्या नियमानुसार विवाहित महिलेला ५०० ग्रॅम, अविवाहित महिलेला २५० ग्रॅम, आणि पुरुषाला १०० ग्रॅम सोने बाळगण्याची सवलत असली तरी केवळ या निर्धारित मर्यादेत सोने आहे म्हणून त्याच्या कायदेशीर स्तोत्राबाबत स्पष्टीकरण देण्याची जबाबदारी संपत नाही, असे सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले आहे. उत्पन्नाच्या ज्ञात स्तोत्रापेक्षा अधिक मालमत्ता बाळगण्याच्या एका प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने हे निरीक्षण नोंदवलेले आहे. बिहारमधील एका भ्रष्टाचाराच्या खटल्यात संबंधित महिलेने आयकर विभागाच्या १९९४ मधील निर्देशांचा आणि सीबीटीडीच्या २०१६मधील प्रसिद्ध पत्रकाचा आधार घेत पाटणा उच्च न्यायालयात धाव घेतली होती. निर्धारित मर्यादेत सोने बाळगण्याची परवानगी असल्याचा युक्तिवाद ग्राह्य धरत पाटण हाय कोर्टाने संबंधित महिलेविरुद्धची फौजदारी कार्यवाही रद्द केली होती. मात्र बिहार सरकारने या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले.न्यायमूर्ती के.व्ही. विश्वनाथन,आणि न्यायमूर्ती अरुण पल्ली यांच्या खंडपीठाने या प्रकरणावर सुनावणी करताना पाटणा उच्च न्यायालयाचा आदेश रद्दबातल ठरवला. सोने बाळगण्याची परवानगी असणे,आणि त्या सोन्याचा कायदेशीर स्त्रोत सिद्ध करणे, या दोन संपूर्णपणे वेगवेगळ्या बाबी असल्याचे खंडपीठाने नमूद केले आहे. केवळ सरकारी परिपत्रकामुळे कोणत्याही मालमत्तेचा किंवा सोन्याचा कायदेशीर स्त्रोत आपोआप सिद्ध होत नाही. असेही न्यायालयाने ठामपणे सांगितले. आयकर छाप्यादरम्यान ठराविक मर्यादेपर्यंतचे सोने जप्त केले जात नाही याचा अर्थ ते सोने बेहिशोबी उत्पन्नातून खरेदी केलेले नाही, असा होत नाही. विशेषत: भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत सुरू असलेल्या तपासात संबंधित व्यक्तीला प्रत्येक मालमत्तेचा, आणि सोन्याचा हिशोब देणे, बंधनकारक आहे. सुप्रीम कोर्टाचे या निकालामुळे विशेष दक्षता न्यायालयाने घेतलेली दखल पुन्हा बहाल झाली असून संबंधित महिलेविरुद्धचा खटला आता पुढे सुरू राहणार आहे. सर्वसामान्य नागरिकांसाठी तसेच सरकारी कर्मचाऱ्यांसाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. कारण घरात असलेल्या सोन्याच्या पावत्या, वारसा हक्काचे पुरावे, किंवा भेटू वस्तूची नोंद ठेवणे,यापुढे अधिक गरजेचे ठरणार आहे. भारतात सोने खरेदी करणे परंपरेने शुभ मानले जाते लग्न, उत्सव, किंवा इतर खास कार्यक्रम प्रसंगी अनेक लोक सोन्याचे दागिने खरेदी करून घरी ठेवतात.महिला आपल्या मुलांच्या लग्नासाठी आगाऊ सोने साठवतात, तर पुरुषही आर्थिक गुंतवणुकीसाठी काही प्रमाणात सोने घेऊन ठेवतात. पण अनेकांना प्रश्न पडतो की घरी किती सोने ठेवणे कायदेशीर आहे? किंवा आयकर विभागाच्या नियमानुसार घरात सोने साठवण्याची मर्यादा किती आहे?आयकराचे नियमानुसार घरात सोनं ठेवण्यासाठी कोणतीही सरकारी मर्यादा नाही. तथापि तुम्ही जेवढे सोने खरेदी कराल, त्याचे स्रोत स्पष्ट करणे महत्त्वाचे आहे. आयकर तपासणी दरम्यान जर तुम्हाला सोन्याचा पुरावा दाखवता आला तर तुम्ही कोणतीही समस्या टाळू शकता. भारतात पुरुष, विवाहित महिला, आणि अविवाहित महिलांसाठी सोने खरेदी चे आणि साठवण्याचे नियम वेगळे आहेत.विवाहित महिलांना पाचशे ग्रॅम ठेवण्याची परवानगी आहे. अविवाहित महिला अडीचशे ग्रॅम पर्यंत आणि पुरुषासाठी शंभर ग्रॅम पर्यंत सोने ठेवू शकतात. ही रक्कम कोणत्याही परिस्थितीत जप्त केली जात नाही. ही मर्यादा फक्त कागदपत्र नसलेल्या सोन्यासाठी लागू आहे. जर खरेदी पावत्या, वारसा दस्तऐवज, किंवा इतर कायदेशीर पुरावे असतील तर प्रत्येक व्यक्ती मर्यादेपेक्षा जास्त सोने घरात ठेवू शकतात. म्हणजे मालकीची योग्य सिद्धता असल्यास कितीही सोने ठेवणे कायदेशीर आहे. दरम्यान जर घेतलेले सोने विकले तर त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर सरकारला कर भरावा लागेल. जर तुम्ही सोने खरेदी केले. आणि ते तीन वर्षाच्या आत विकले तर तुम्हाला अल्पकालीन भांडवली नफा कर भरावा लागेल. या शिवाय जर तुम्ही तीन वर्षापेक्षा जास्त काळ सोने विकले तर तुम्हाला दीर्घकालीन भांडवली नफा कर भरावा लागेल. आधुनिक काळात सोने फक्त दागिण्यापुरते मर्यादित नसून आर्थिक सुरक्षिततेसाठी ही महत्त्वाची साधन मानले जाते. तरी घरात सोने ठेवताना कागदपत्रे सुरक्षित ठेवणे. आणि खरेदीची नोंद ठेवणे गरजेचे आहे.हे न्यायालयाने सिध्द केलेले आहे.

आमचे वाचक बोलतात...!

घातक फटाके!!

ठाणे शहरात यावर्षी दिवाळी फटाक्यांमुळे आग लागण्याच्या घटनांमध्ये भयंकर वाढ झाली . जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही फटाक्यांची आतषबाजी सुरूच होती . दोन दिवसांमध्ये तब्बल आगीच्या ४९ घटना घडल्या ज्यात मोठ्या प्रमाणात वित्त हानी झाली. रॉकेट आणि सुतळी बॉम्बच्या वापरावर जिल्हाधिकाऱ्यांनी बंदी घातलेली असतानाही या आदेशांची सर्रास पायमल्ली झाली. दिवाळीच्या फटाक्यांमुळे ध्वनीप्रदूषण , वायुप्रदूषण ज्याचा नागरिकांना अतोनात त्रास सहन करावा लागला.

- अनिल लक्ष्मण डोंगरे, नारायणगाव

वाचकपत्रे पाठविण्यासाठी : news.sandhya@gmail.com

गुलाबाचे फूल आणि नेहरू चाचांचे प्रेम

चिमुरड्यांच्या हास्यामध्ये, वसले नेहरूंचे प्राण,
देशासाठी अर्पण केले, त्यांनी आपले जीवन दान.
गुलाब जैसे फुलले होते, त्यांचे साधे रूप,
नेहरू चाचा जयंतीचा, आनंद वाटे खूप. (१)

बालकांचे लाडके चाचा, प्रेमळ त्यांचा भाव,
प्रगतीच्या या वाटेवरती, दिले नवे एक नाव.
फुलांसारखे जपावे त्यांना, हाच त्यांचा संदेश,
ज्ञानाच्या या तेजानेच, उजळून निघेल देश. (२)

सत्य आणि शांतीचा, दिला त्यांनी मंत्र,
आधुनिक या भारताचे, रचले नवे तंत्र.
लहानग्यांच्या स्वप्नांना, मिळाले नवे बळ,
साकार झाले त्यांच्यामुळे, उद्याचे सुंदर फळ. (३)

बालदिनाच्या शुभदिनी, करूया त्यांना वंदन,
विचारांच्या या सुगंधाने, बहरले हे नंदन.
आदर्श त्यांचे जपूया, घडवू नवा इतिहास,
चाचांच्या या स्मृतींना, नमन करूया खास.(४)

- नरेंद्र ह. राऊत, मधुकर नगर, दहिसर (पश्चिम) मुंबई

व्यावसायिक शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व

सुधाकर जगदाळे : मुख्याध्यापक अधिवेशनात पुणे जिल्ह्याच्या वतीने प्रबंध सादर

■ बोर्डी (पालघर) (दै. संध्या)



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे ६५ वे राज्यस्तरीय शैक्षणिक अधिवेशन दि. १३ व १४ नोव्हेंबर रोजी बोर्डी (जि. पालघर) येथे संपन्न झाले. या अधिवेशनात पुणे जिल्ह्याच्या वतीने मुख्याध्यापक संघाचे उपाध्यक्ष तथा विद्या समितीचे अध्यक्ष श्री. सुधाकर बबनराव जगदाळे यांनी 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत व्यावसायिक शिक्षण : धोरणात्मक दिशा, प्रभावी अंमलबजावणी आणि मुख्याध्यापकांची भूमिका' या विषयावर अभ्यासपूर्ण प्रबंध सादर केला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता कौशल्याधारित, रोजगाराभिमुख व व्यावसायिक शिक्षण देण्याची आवश्यकता स्पष्ट केली. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता, स्वावलंबन आणि प्रत्यक्ष कामाचा अनुभव विकसित करण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरण महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी नमूद केले. या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये मुख्याध्यापकांची भूमिका निर्णायक असल्याचेही त्यांनी प्रतिपादन केले. पुणे जिल्ह्याच्या वतीने राज्यस्तरीय अधिवेशनात अभ्यासपूर्ण प्रबंध सादर केल्याबद्दल श्री. सुधाकर जगदाळे यांचे शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.या प्रसंगी शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, महामंडळाचे अध्यक्ष तानाजी माने,सुभाष माने, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त महामंडळाचे सचिव नंदकुमार सागर,मा. प्रवक्ते महेन्द्र गणपुले, अधिवेशन अध्यक्ष बी.बी.पाटील,पालघर जिल्हा अध्यक्ष डॅरल डिमेलो उपाध्यक्ष सचिन नलवडे, जिल्हाध्यक्ष प्रसाद गायकवाड,कार्याध्यक्ष राजेश गायकवाड ,सचिव शिवाजी कामठे,जगन्नाथ पाटील,विद्या समिती सचिव संजयकुमार झांबरे,चंद्रकांत सोलसे, इंटर्नल ऑडिटर प्राचार्य तुकाराम बेनके, माध्यमिक शिक्षक संघाचे प्रवक्ते वसंतराव ताकवले, दिलिप थोपटे सर,शिरुर तालुका मुख्याध्यापक संघाचे उपाध्यक्ष गुलाबराव डाळिंबकर,भाऊसाहेब वाघ,सहसचिव अशोक दहिफळे इ.मान्यवरांनी पुणे जिल्ह्याच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

ऑल आर्टिस्ट फाउंडेशनचा सहावा वर्धापन दिन

■ पुणे (दै. संध्या)



■ सुदेश भोसले यांना जीवनगौरव पुरस्कार

ऑल आर्टिस्ट फाउंडेशन (महाराष्ट्र राज्य) यांच्या सहाव्या वर्धापन दिनानिमित्त १७ नोव्हेंबर रोजी बालगंधर्व रंगमंदिर येथे भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० वाजल्यापासून दिवसभर विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि पुरस्कार वितरण सोहळा रंगणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष योगेश सुपेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. यंदाचा जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ गायक व मिमिक्री कलाकार सुदेश भोसले यांना जाहीर झाला आहे. अभिनेत्री वर्षा उसगावकर आणि मानसी नाईक यांच्यासह चित्रपट, नाटक, मालिका, संगीत, लोककला, तांत्रिक व प्रसारमाध्यम क्षेत्रातील मान्यवरांना कलाभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाची सुरुवात 'नाट्य मधुगंध' या संगीत नाट्यप्रवेशाने होणार असून, सुदेश भोसले यांची ओंकारेश्वर मंदिर ते बालगंधर्व रंगमंदिर अशी मिरवणूक काढण्यात येणार आहे. पुरस्कार वितरणानंतर लावणीसम्राज्ञी माया खुटेगावकर यांचा महिलांसाठी विशेष लावणी महोत्सव होईल. अंजन घोष व सुजाता जोशी यांच्या 'रेट्रोनोवा' संगीत रजनीने कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

चित्रपट, नाटक, मालिका, लोककला, तमाशा, वाद्यवृंद, ध्वनी, प्रकाश आणि नाट्य व्यवस्थापन अशा विविध क्षेत्रांतील कलावंतांचा गौरव या सोहळ्यात करण्यात येणार आहे.

युवा उद्योजकांकडून वृक्षसंवर्धनासाठी पुढाकार;

झाडांच्या मुळांना दिले मातीचे संरक्षण

■ नारायणगाव (दै. संध्या)



हिवरे तर्फे नारायणगाव येथील स्मशानभूमी रस्त्यालगत असलेल्या वड, पिंपळ आणि उंबराच्या झाडांचे संवर्धन करण्यासाठी गावातील युवा उद्योजकांनी सामाजिक बांधिलकी जपत पुढाकार घेतला. उघड्या पडलेल्या झाडांच्या मुळांवर माती टाकून त्यांना संरक्षण देण्याचे काम करण्यात आले. काही वर्षांपूर्वी नारायणगाव पोलिस ठाण्याचे तत्कालीन सहाय्यक पोलिस निरीक्षक टी. वाय. मुजावर यांच्या हस्ते या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले होते. कालांतराने काही झाडे जगली; मात्र त्यांच्या मुळांवरील माती वाहून गेल्याने मुळे उघडी पडली होती. त्यामुळे या झाडांचे योग्य संवर्धन करण्याची गरज निर्माण झाली होती. ही बाब लक्षात घेऊन युवा उद्योजक साहिल सुनील भोर यांनी स्वतःच्या वाहनातून झाडांच्या बुंध्याजवळ माती आणून टाकली. त्यानंतर युवा उद्योजक संतोष फकिरा भोर यांनी जेसीबीच्या साहाय्याने ही माती झाडांच्या बुंध्याभोवती पसरवून उघड्या पडलेल्या मुळ्या झाकण्याचे काम केले. या उपक्रमासाठी साहिल सुनील भोर, संतोष फकिरा भोर, सामाजिक कार्यकर्ते तथा माजी ग्रामपंचायत सदस्य मनीष मोरडे आणि सामाजिक कार्यकर्ते मंगेश भोर यांनी सहकार्य केले. पर्यावरणाचे रक्षण केवळ वृक्षारोपणापुरते मर्यादित नसून लावलेल्या झाडांचे संगोपन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. याची जाणीव ठेवून युवा उद्योजकांनी केलेल्या या कृतीचे ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.

सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल साहेबराव खामकर यांना 'हडपसर रत्न' पुरस्कार

आदित्य ठाकरे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान; विविध क्षेत्रांतील अकरा मान्यवरांचा सन्मान

■ लोणी काळभोर (दै. संध्या)



सार्वजनिक क्षेत्रात विविध माध्यमांतून उल्लेखनीय सामाजिक कार्य करणाऱ्या अकरा मान्यवरांचा माजी पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांच्या हस्ते 'हडपसर रत्न' पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये सहकार क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे साहेबराव खामकर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले की, समाजासाठी निस्वार्थपणे कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्याची संधी मिळणे, ही आपली स्वतःची उंची वाढविण्यासारखी बाब आहे. अशा व्यक्ती समाजासाठी अत्यंत महत्त्वाच्या असून, त्यांच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभे राहू. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या योगदानाची दखल घेऊन हा उपक्रम राबविल्याबद्दल त्यांनी आयोजकांचे कौतुक केले. पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक तथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे गटनेते नितीन गावडे म्हणाले की, सार्वजनिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करून त्यांना प्रोत्साहन देणे हे आपले कर्तव्य आहे. या व्यक्ती प्रामाणिकपणे आपली जबाबदारी पार पाडत असून, समाजासाठी त्यांचे योगदान मोलाचे आहे. साहेबराव खामकर हे साखर उद्योगाचे अभ्यासक असून, देशपातळीवर सहकार क्षेत्रात कार्यरत असलेल्या सहकार भारती संस्थेच्या महाराष्ट्र प्रदेश साखर कारखाना प्रकोष्ठ प्रमुखपदाची जबाबदारी ते सांभाळत आहेत. नुकतेच त्यांचे साखर उद्योगावर आधारित 'गोष्ट साखरेची' हे पुस्तक प्रकाशित झाले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन नितीन गावडे मित्रपरिवाराच्या वतीने करण्यात आले होते. वैद्यकीय, शैक्षणिक, सामाजिक तसेच अन्य क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे नियोजन संकेत झेंडे, फरीद शेख आणि प्रताप खामकर यांनी केले.

ज्ञानेश्वरीचा विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे आवश्यक

आ. बाबाजी काळे : आळंदीत 'ओळख श्री ज्ञानेश्वरी' पुस्तकाचे प्रकाशन

■ आळंदी (दै. संध्या)



संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींची ज्ञानेश्वरी हा केवळ धार्मिक ग्रंथ नसून संपूर्ण मानवजातीला जीवन जगण्याची दिशा देणारा अमूल्य ठेवा आहे. ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञान, विचार आणि जीवनमूल्ये नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी 'ओळख श्री ज्ञानेश्वरी' परिवाराने हाती घेतलेला उपक्रम कौतुकास्पद असून, अशा उपक्रमांतून माउलींचे विचार घराघरांत पोहोचतील, असे प्रतिपादन आमदार बाबाजी काळे यांनी केले. श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमेटी, आळंदी देवाची आणि 'ओळख श्री ज्ञानेश्वरी एक परिवार' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ओळख श्री ज्ञानेश्वरी' पुस्तक प्रकाशन व सन्मान सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी आमदार बाबाजी काळे यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. ज्ञानेश्वरीमध्ये जीवनातील प्रत्येक प्रश्नाचे उत्तर आणि माणसाला योग्य मार्ग दाखविण्याची ताकद आहे. संत ज्ञानेश्वर माउलींनी आपल्या विचारांतून समाजाला समता, बंधुता, मानवता आणि सदाचाराचा संदेश दिला आहे. हा विचार केवळ ग्रंथापुरता मर्यादित न राहता तो प्रत्येकाच्या आचरणात उतरला पाहिजे. विशेषतः आजच्या तरुण पिढीला संत साहित्याची ओळख करून देण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचेही काळे यांनी नमूद केले. या सोहळ्याला डॉ.नारायण महाराज जाधव, आळंदी देवस्थानचे विश्वस्त डॉ.भावार्थ देखणे, पुरुषोत्तम पाटील, प्रकाश काळे, ज्ञानेश्वर वीर, अजित वडगावकर, वसंत लोंढे, तुकाराम गवारी, सुभाष गेठे, उमेश बागडे, श्रीधर घुंडरे, प्राजक्ता हरपळे, विलास वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी ज्ञानेश्वरीच्या प्रचार व प्रसारासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या विविध संस्था, प्राचार्य आणि अध्यापकांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

प्राध्यापकांच्या लेखणीतून साकारली पाच पुस्तके

■ नारायणगाव (दै. संध्या)

फार्मसी क्षेत्रातील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासह विद्यार्थ्यांना अद्ययावत ज्ञान उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाच्या नवीन मार्गदर्शक तत्त्वांनुसार आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार तयार करण्यात आलेल्या पाच शैक्षणिक पुस्तकांचे प्रकाशन जयहिंद कॉलेज ऑफ फार्मसी येथे उत्साहात पार पडले. या पुस्तकांचे लेखन महाविद्यालयातील प्राध्यापकांनी केले असून, बी. फार्मसीच्या सुधारित अभ्यासक्रमाला अनुसरून ही पुस्तके तयार करण्यात आली आहेत. यामध्ये जनरल फार्मसी या पुस्तकाचे लेखन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तेजस शिवराम पाचपुते यांनी केले आहे. फार्मास्युटिकल इनऑरगॅनिक ॲनालिटिकल केमिस्ट्री या पुस्तकाचे लेखक डॉ. अण्णासाहेब गायकवाड आहेत. लॅब मॅन्युअल ऑफ इंट्रोडक्शन टू फार्माकोग्नोसी या पुस्तकाचे लेखन प्रा. सुचिता शेटे, प्रॅक्टिकल लॅब मॅन्युअल ऑफ हेल्थकेअर सायकॉलॉजीचे लेखन प्रा. श्रुती राऊत, तर लॅब मॅन्युअल ऑफ ह्युमन ॲनाटॉमी अँड फिजिओलॉजी अँड पॅथोफिजिओलॉजी या पुस्तकाचे लेखन प्रा. अभिषेक भोर, प्रा. ओंकार जाधव आणि प्रा. प्रियंका देठे यांनी केले आहे. या प्रकाशन सोहळ्याला जयहिंद संकुलाचे अध्यक्ष जितेंद्र गुंजाळ, इंजीनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ.अमोल उबाळे, पुणे येथील प्रसिद्ध वक्ते डॉ. प्रवीण बुगे, डॉ.शुभांगी गुंजाळ, प्रा.राजकुमार मानकर, प्रा. सुभाष आंग्रे यांच्यासह प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. पुस्तक लेखनातील योगदानाबद्दल सर्व लेखक प्राध्यापकांचा संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी जयहिंद संकुलाचे अध्यक्ष जितेंद्र गुंजाळ, संचालिका डॉ. शुभांगी गुंजाळ, प्राचार्य डॉ. तेजस पाचपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. डी. एस. गल्हे, सचिव विजय गुंजाळ यांनी लेखकांचे अभिनंदन केले. प्राध्यापकांच्या या शैक्षणिक योगदानामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेत भर पडली असून, फार्मसीच्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी उपयुक्त संदर्भ साहित्य उपलब्ध झाले आहे.

केळीला कवडीमोल भाव; जुन्नर तालुक्यातील शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात!

■ जुन्नर (दै. संध्या)

■ एकरी दीड लाखांचा उत्पादन खर्च; व्यापाऱ्यांकडून मात्र किलोला अवघा ५ ते ६ रुपये भाव – किरकोळ बाजारात डझनाला ५० ते ७० रुपये!

जुन्नर तालुक्यात केळीचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. मात्र सध्या केळीला बाजारात अत्यंत कमी दर मिळत असल्याने केळी उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. वर्षभर तळहाताच्या फोडाप्रमाणे केळीच्या पिकाची काळजी घेऊन, वाढत्या उत्पादन खर्चाचा भार सहन करत तयार केलेल्या पिकाला दिवाळीच्या सणातही अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांची दिवाळी अंधारातच जाण्याची वेळ आली आहे. केळीच्या उत्पादनासाठी शेतकऱ्यांना प्रति एकर सुमारे दीड लाख रुपये खर्च येत आहे. खतांच्या वाढलेल्या किमती, औषधे, मजुरी, पाणी आणि इतर मशागतीचा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. उत्पादनासाठी प्रतिकिलो ५ ते ६ रुपये खर्च येत असताना व्यापाऱ्यांकडूनही केळीला किलोमागे अवघा ५ ते ६ रुपये भाव दिला जात आहे. त्यामुळे उत्पादन खर्चही भरून निघणे कठीण झाले आहे. विशेष म्हणजे, कमी दरामुळे व्यापारी केळी खरेदी करण्यास टाळाटाळ करत असल्याने अनेक शेतकऱ्यांचा माल शेतातच पिकून खराब होण्याची वेळ आली आहे. दुसरीकडे किरकोळ बाजारात मात्र केळीचे दर कमी झालेले दिसत नाहीत. सध्या ग्राहकांना किरकोळ बाजारात केळीचा डझनाला ५० ते ७० रुपये दर मोजावा लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मिळणारा दर आणि ग्राहकांकडून आकारला जाणारा दर यामध्ये मोठी तफावत असल्याचे चित्र आहे. जुन्नर तालुक्यातील कित्तेक शेतकऱ्याच्या शेतातील केळी सध्या काढणीच्या अवस्थेत आहे. मात्र बाजारात दर नसल्याने हा माल विकायचा कसा, असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला आहे. वर्षभर केलेली मेहनत आणि लाखोंची गुंतवणूक वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे. तरीदेखील डोळ्यासमोर उभ्या असलेल्या उभ्या पिकाची नासाडी होऊ नये म्हणून मिळेल त्या भावात शेतकरी व्यापाऱ्यांना केळी देत आहे. एकीकडे किरकोळ बाजारात ग्राहकांना केळी महाग मिळत असताना दुसरीकडे उत्पादक शेतकऱ्यांना मात्र कवडीमोल दर मिळत आहे. व्यापारी आणि ग्राहक यांच्यामधील दरातील तफावत कमी करून उत्पादकांना योग्य मोबदला मिळणे गरजेचे आहे. केळीला किमान हमीभाव किंवा योग्य दर मिळावा, तसेच बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने लक्ष घालावे, अशी मागणी केळी उत्पादक शेतकऱ्यांकडून होत आहे.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे



छत्रपती शिवाजी महाराजांची 'वाघनखे' पुणेकरांसाठी उपलब्ध करून द्यावीत

■ रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे राहुल डंबाळे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

पुणे : दैनिक संध्या

लंडनच्या व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियममधून महाराष्ट्रात आणण्यात आलेली छत्रपती शिवाजी महाराजांची ऐतिहासिक 'वाघनखे' पुणे येथील शिवप्रेमी आणि नागरिकांना पाहण्यासाठी पुण्यात प्रदर्शनास ठेवावीत, अशी मागणी रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे राहुल डंबाळे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड. आशिष शेलार यांना निवेदन पाठवून ही मागणी लावून धरली आहे. राज्य शासनाच्या सध्याच्या नियोजनानुसार ही ऐतिहासिक वाघनखे सातारा, नागपूर, कोल्हापूर आणि सध्या मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज वास्तुसंग्रहालयात प्रदर्शनासाठी ठेवण्यात आली आहेत. मात्र, या संपूर्ण वेळापत्रकात पुणे शहराचा समावेश नसल्याने पुणेकरांमध्ये आणि शिवप्रेमींमध्ये नाराजीची भावना आहे. या मागणीबाबत बोलताना राहुल डंबाळे म्हणाले की, "पुणे ही स्वराज्याची भूमी असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या बालपणाचा आणि पराक्रमाचा इतिहास या मातीशी जोडलेला आहे. पुण्यात देशभरातून शिक्षण आणि नोकरीसाठी आलेले लाखो तरुण, विद्यार्थी आणि स्थानिक शिवभक्त राहतात. प्रत्येकाला मुंबईला जाऊन ही वाघनखे पाहणे शक्य नाही. त्यामुळे राज्य शासनाने लंडनच्या संग्रहालयाशी विशेष पाठपुरावा करून पुण्यातही या वाघनखांचे प्रदर्शन भरवावे, जेणेकरून पुणेकरांना आपल्या राजाच्या पराक्रमाचे प्रतीक जवळून पाहता येईल." पुण्यातील सुरक्षित आणि ऐतिहासिक वास्तूमध्ये या प्रदर्शनाचे आयोजन केल्यास लाखो शिवभक्तांना त्याचा लाभ घेता येईल, असेही डंबाळे यांनी निवेदनात नमूद केले आहे.



आपुलकीच्या दिवाळीने श्रीवत्समधील मुलांच्या चेहऱ्यावर फुलला आनंद

पुणे : दैनिक संध्या

दिवाळी हा आनंद, प्रेम आणि आपुलकीचा सण. मात्र, कुटुंबाचा आधार नसलेल्या अनाथ मुलांच्या आयुष्यात या सणाचा आनंद फुलवण्यासाठी केवळ भेटवस्तू नव्हे, तर मायेचा स्पर्श, प्रेमाची ऊब आणि कौतुकाची थापही तितकीच महत्त्वाची असते. या मुलांच्या आयुष्यात आनंदाचे क्षण निर्माण व्हावेत, त्यांनाही दिवाळीचा सण आपलेपणाने साजरा करता यावा, या भावनेतून शनिवार पेठ मेहुणपुरा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आणि सहयोगी संस्थांच्या वतीने ससून रुग्णालय आवारातील श्रीवत्स संस्थेतील मुलांसोबत आपुलकीची दिवाळी साजरी करण्यात आली. या उपक्रमामुळे चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. विविध गुणदर्शन कार्यक्रमातून मुलांनी आपले कलागुण सादर करीत उपस्थितांची मने जिंकली. शनिवार पेठ मेहुणपुरा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आणि सहयोगी संस्थांच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे यंदा ३३ वे वर्ष आहे. या कार्यक्रमाला शिक्षण प्रसारक मंडळी नियामक मंडळ अध्यक्ष सुधीर काळकर, अॅड. शिरीष शिंदे, मंदार ठाकूर देसाई, नितीन पंडित, गायक राहुल जोशी, गायिका रश्मी मोघे, कुमार रेणूसे, आनंद सराफ उपस्थित होते. यावेळी श्रीवत्समधील मुलांनी विविध गाण्यांवर नृत्य सादर केले. तसेच विविध गुणदर्शन कार्यक्रमातून आपल्यातील कलागुण सादर करीत दिवाळीचा आनंद द्विगुणित केला. मुलांच्या सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. मुलांसोबत संवाद साधत त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच संस्थेला आवश्यक मदतीचे सहकार्य करण्यात आले.



येरवडा खुले कारागृहात बंद्यांसाठी संतविचारांचा जागर!

ह. भ. प. प्रशांतमहाराज मोरे देहूकर यांचे 'जीवनातील स्वहिताचा मार्ग' विषयावर प्रेरणादायी प्रवचन

■ पुणे (दै. संध्या)

दिवाळीच्या मंगलमय पर्वानिमित्त बंद्यांच्या जीवनात आनंद, सकारात्मकता आणि आध्यात्मिक विचारांची ज्योत प्रज्वलित करण्याच्या उद्देशाने येरवडा खुले कारागृहात 'आनंदी दिवाळी' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. धनत्रयोदशीच्या शुभदिनी रविवार, ८ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १२.३० या वेळेत आयोजित या कार्यक्रमात जगतगुरू संत तुकाराम महाराजांचे अकरावे वंशज ह. भ. प. प्रशांतमहाराज मोरे देहूकर यांनी 'जीवनातील स्वहिताचा मार्ग' या विषयावर प्रेरणादायी प्रवचन केले. समाज प्रबोधन चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष जयवंत हिरे यांच्या माध्यमातून या विशेष प्रवचनाचे आयोजन करण्यात आले होते. कारागृहातील बंद्यांना संतविचारांची ओळख करून देऊन त्यांच्या मनात आत्मचिंतन, सकारात्मकता आणि जीवनात परिवर्तन घडविण्याची प्रेरणा निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमाचे आयोजन कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक डॉ. सुहास वारके, विशेष कारागृह महानिरीक्षक योगेश देसाई आणि कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे येथील सुनील ढमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्त्या तृप्तीताई देसाई, जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष डॉ. सुधाकर जाधवर, प्रसिद्ध माईंड पॉवर ट्रेनर दत्ताजी कोहिनकर, प्रसिद्ध अभिनेते सिद्धेश्वर झाडबुके, समर्थ मोरे, अशोक महाराज काळे, दिनेश कुंभार, रायकर सर, सामाजिक कार्यकर्ते घनश्याम निम्हण, सामाजिक कार्यकर्त्या डॉ. मृणाल इनामदार, पिंकॅथॉन अॅम्बेसेडर व नऊवारी साडी रनर, दीपाताई परब, रणरागिनी महिला बाउन्सर ग्रुप तसेच सामाजिक कार्यकर्त्या आयेशा तांबोळी यांची उपस्थिती होती. प्रवचनादरम्यान ह. भ. प. प्रशांतमहाराज मोरे देहूकर यांनी संत तुकाराम महाराजांच्या अभंगांच्या माध्यमातून जीवनाचे खरे मर्म उलगडून सांगितले. आत्मपरीक्षण, सद्विचार, परोपकार, प्रामाणिकपणा, संयम, कुटुंबाप्रती असलेली जबाबदारी आणि चांगल्या कर्माचे महत्त्व त्यांनी विशद केले.

माणसाने भूतकाळातील चुकांमधून शिकून वर्तमानकाळात योग्य मार्गाचा स्वीकार करावा आणि भविष्यात सन्मानाने व सकारात्मकतेने जीवन जगावे, असा मोलाचा संदेश त्यांनी दिला. जीवनात आलेल्या अडचणींवर मात करण्यासाठी आत्मविश्वास, संयम आणि चांगल्या विचारांची साथ आवश्यक असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

कारागृहातून समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी प्रेरणा

कारागृह हे केवळ शिक्षा भोगण्याचे ठिकाण नसून व्यक्तीच्या विचारांमध्ये परिवर्तन घडवून आणणारे, आत्मचिंतनाची संधी देणारे आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात सन्मानाने पुनरागमन करण्यासाठी प्रेरणा देणारे केंद्र आहे, हा महत्त्वपूर्ण विचार या कार्यक्रमातून मांडण्यात आला. दिवाळीच्या निमित्ताने बंद्यांना आध्यात्मिक आनंद, मानसिक बळ आणि नव्याने जीवन जगण्याची सकारात्मक दिशा मिळावी, यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. दिवाळीचा खरा आनंद केवळ दिव्यांच्या प्रकाशात नसून मनातील अज्ञान, नकारात्मकता आणि वाईट विचारांचा अंधार दूर करून सद्विचारांचा प्रकाश निर्माण करण्यात आहे, हा संदेश यावेळी देण्यात आला. संतविचारांच्या माध्यमातून बंद्यांच्या मनात आत्मविश्वास, आशा आणि नव्याने आयुष्याला सुरुवात करण्याची प्रेरणा निर्माण करणारा हा उपक्रम येरवडा खुले कारागृहासाठी संस्मरणीय ठरला.

अधिकारी व कर्मचाऱ्यांचे नियोजन

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी येरवडा खुले कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे यांच्या नेतृत्वाखाली तुरुंग अधिकारी नागनाथ भानवसे, सुभेदार दत्तात्रय चव्हाण, सुभेदार बालाजी सावंत, सुभेदार सुनील गायकवाड, हवालदार राजेंद्र धनगर, शिपाई दिवेकर, वैशाली थोरात, शिपाई सुरेखा म्हेत्रे, संध्या जाधवर, मिसबा सय्यद, सरला साबळे, मोनिका लांडगे, वैभव पाटील, अशोक होले तसेच इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सुरक्षा व्यवस्था, नियोजन आणि समन्वयाची जबाबदारी पार पाडली.

आदिवासी शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र 'भगवान बिरसा मुंडा जलयुक्त शिवार अभियान'

■ पुणे (दै. संध्या)

राज्यातील विविध जिल्ह्यांत स्थायिक असलेल्या आदिवासी शेतकऱ्यांना शेतीसह पिण्यासाठी आणि पशुधनासाठी कायमस्वरूपी पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी स्वतंत्रपणे 'भगवान बिरसा मुंडा जलयुक्त शिवार अभियान' शासनाच्या वतीने राबविण्यात येणार आहे. या अभियानाची आदिवासी विकास आयुक्तालयाने दखल घेतली असून, राज्य शासनाने देखील या योजनेस तत्त्वत: मान्यता दिली आहे. राज्यात आदिवासी शेतकऱ्यांची संख्या ८० लाखांच्या जवळपास आहे. नंदुरबार, गडचिरोली या जिल्ह्यांत सर्वाधिक आदिवासी शेतकरी आहेत. दरम्यान, ज्या शेतकऱ्यांकडे जमीन आहे, ते शेतकरी केवळ पावसाच्या जोरावरच जमीन कसत आहेत. त्यामुळे पावसाळा संपल्यानंतर संबंधित भागांत पाण्याची कोणतीही सोय उपलब्ध नसल्यामुळे या शेतकऱ्यांना वर्षातून केवळ तीन ते पाच महिनेच शेतीत पिके घेता येतात. त्यामुळे त्यांचे जगणे अवघड झाले आहे. वर्षानुवर्षे हे शेतकरी कायमस्वरूपी शेतीसाठी पाणी उपलब्ध करून द्यावे, यासाठी झगडत आहेत. आदिवासी विकास व सुरक्षा असोसिएशनचे अध्यक्ष रवींद्र तळपे हे गेल्या अनेक वर्षांपासून आदिवासी विभागाचे आयुक्त, प्रधान सचिव आणि शासनाकडे जलयुक्त शिवार राबवावे, याबाबत पाठपुरावा करीत आहेत. याची आता राज्य शासनाने दखल घेतली आहे. या आदिवासी शेतकऱ्यांच्या शेतीला कायमस्वरूपी पाणी मिळावे, यासाठी जलयुक्त शिवार अभियान सुरू करण्यासाठी नाशिक येथील आदिवासी विकास आयुक्तालयात आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची विशेष बैठक घेण्यात आली. त्यामध्ये जलयुक्त शिवार अभियान राबविण्याबाबत सखोल चर्चा झाली आहे. अभियानाचा हा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात आला होता. त्यास आता तत्त्वत: मान्यता देण्यात आली आहे. दरम्यान, राज्यात विविध जिल्ह्यांत अनेक आदिवासी गावे डोंगराळ व जंगल परिसरात आहेत. तेथील शेती प्रामुख्याने पावसावर अवलंबून आहे.

असगार्ड अल्कोबेवच्या नफ्यात १४०० टक्क्यांहून अधिक वाढ

■ पुणे (दै. संध्या)

मद्यनिर्मिती क्षेत्रातील असगार्ड अल्कोबेव लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या दुसऱ्या तिमाहीत दमदार आर्थिक कामगिरी नोंदवली आहे. जुलै ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत कंपनीचा महसूल वार्षिक आधारावर १०२.८४ टक्क्यांनी वाढून ४८.९३ कोटी रुपयांवर पोहोचला. तर कंपनीचा करपश्चात नफा १६.९५ लाख रुपयांवरून वाढून २.५५ कोटी रुपये झाला. नफ्यात तब्बल १४०२.३० टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली.

फेब्रुवारी २०२६ मध्ये सीएमजे ब्रुअरीज प्रायव्हेट लिमिटेडमधील नियंत्रक हिस्सा संपादन केल्यानंतर कंपनीने मद्यनिर्मिती व्यवसायावर लक्ष केंद्रित केले आहे. उत्पादन क्षमतेचा वाढता वापर, खर्चावरील नियंत्रण आणि कार्यक्षम व्यवस्थापनामुळे कंपनीच्या आर्थिक कामगिरीत सुधारणा झाली आहे. दुसऱ्या तिमाहीत कंपनीचा EBITDA मागील तिमाहीच्या तुलनेत ४२.३१ टक्क्यांनी वाढून ७.३३ कोटी रुपये झाला. EBITDA मार्जिन ९.७१ टक्क्यांवरून वाढून १४.९८ टक्क्यांवर पोहोचले. निव्वळ नफ्यातही तिमाही आधारावर ५०.४८ टक्क्यांची वाढ झाली. कंपनीचे एकूण उत्पादन १८.६ टक्क्यांनी वाढून १३.८२ लाख केस झाले, तर उत्पादनाचा पुरवठा १४ टक्क्यांनी वाढून १३.५८ लाख केस झाला. उत्पादन क्षमता वापर ६३.१ टक्क्यांवरून ७८.६ टक्क्यांवर पोहोचला. कॅनमधील बिअरचे उत्पादन ६७.७ टक्क्यांनी वाढून ४.९९ लाख केस झाले. कंपनी मार्च २०२७ पर्यंत आपली वार्षिक उत्पादन क्षमता ८४ लाखांवरून १.०८ कोटी केसपर्यंत वाढवणार आहे. तसेच ईशान्य आणि पूर्व भारताबाहेरील बाजारपेठांमध्ये विस्ताराच्या संधी शोधल्या जात आहेत. व्यवस्थापकीय संचालक रोनक जैन यांनी सांगितले की, उत्पादन क्षमता वाढवणे, खर्च नियंत्रण आणि कराराधारित उत्पादन भागीदारी मजबूत करण्यावर कंपनीचा भर असेल. आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी कंपनीने २४ ते २८ कोटी रुपयांच्या EBITDA चे लक्ष्य ठेवले आहे.

महसूल दुपटीने वाढून ४८.९३ कोटींवर

ASGARD ALCOBEV

आदिवासी लोकजीवन

भगवान बिरसा मुंडा जयंती निमित्त विशेष लेख

(शुभांगी श. कांबळे) वरिष्ठ संशोधन अधिकारी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती पुणे विभाग.

जो समाज आपला इतिहास विसरतो, तो समाज आपलं भविष्य सुरक्षित करू शकत नाही या उक्तीप्रमाणे आदिवासींनी आता आपल्या इतिहासावर काम करणे अत्यंत आवश्यक आहे. जितके अधिक काम इतिहासावर होईल, तितका अधिक समाज गतिशील होईल यात शंका नाही. आदिवासींकडे पाहण्याचा जगाचा दृष्टिकोन बदलण्यासाठी आदिवासींच्या सामाजिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक योगदानाबद्दल जास्तीत जास्त विचार मंथन घडवून आणणे आवश्यक आहे. आदिवासींमध्ये शैक्षणिक क्रांती हवी असेल तर आवश्यकता आहे शिक्षकांनी जबाबदारी स्वीकारण्याची. केवळ अभ्यासक्रम बदलून क्रांती येणार नाही किंवा मोफत शिक्षण देवूनही क्रांती होणार नाही. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये असणारा नेतृत्वगुणांचा अभाव, वाढणारी बेशिस्त, गैरहजेरीचे वाढते प्रमाण, अभ्यासाकडे दुर्लक्ष्य करण्याची प्रवृत्ती, वक्तशीरपणाचा अभाव, अनैतीकपणाचा स्वीकार आणि नेमून दिलेले काम पूर्ण करण्याची वृत्ती यांची कारणे शोधून त्यांच्या उपायांवर लक्ष्य केंद्रित केल्यास खरोखर आपल्या शाळांचा दर्जा तर बदलेलच परंतु या आदिवासी वादळामुळे भविष्यात समाजाचे होणारे नुकसान टळेल. "आदिवासी मुळ निवासी नाळ त्यांची अरण्यासी मनस्वी भाबडा सत्यांसी ओळख जाणे प्रथा परंपरेसी"

भगवान बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी झाला. त्यानिमित्ताने भारत सरकारने २०२१ मध्ये १५ नॉव्हेंबर हा दिवस 'जनजातीय गौरव दिवस' म्हणून घोषीत केला. हा दिवस बिरसा मुंडा यांच्या जन्मदिनानिमित्त आदिवासी स्वातंत्रसैनिकांच्या योगदानाचे स्मरण करण्यासाठी साजरा केला जातो. त्यानिमित्ताने आपण आदिवासी लोकजीवनावर प्रकाश टाकुया!

आर्य लोक दंडकारण्य ओलांडून दक्षिणेकडे येण्यापूर्वी या भागात भिल्ल, निषाद, किरात, कोल आणि शबर या वंशाचे लोक राहत होते. रामायण महाभारताच्या काळापासून जुन्या वाङमयात त्यांचे वर्णन आढळते. आर्यांचे हिंदुस्थानात आगमन होण्यापूर्वी आदिवासी हेच या देशाचे मूळ रहिवासी होते. त्या काळी आदिवासी टोळ्याटोळ्यांनी राहात होते. इकडे आल्यावर आर्यांनी इथली भूमी काबीज केली. तेव्हा आदिवासींच्या टोळ्यांपैकी पुष्कळ टोळ्यांनी आर्य लोकांशी जुळवून घेतले. काही टोळ्या लढल्या, झगडल्या. पराभूत झाल्या. स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व टिकविण्यासाठी पर्वतमय प्रदेशातल्या दऱ्याखोऱ्यांत जंगलाच्या आश्रयाला जाऊन राहिल्या. त्यामुळे आदिवासींची वस्ती आजही प्रामुख्याने जंगलात, डोंगरदऱ्यांच्या प्रदेशात आढळून येते.

प्राचीन वन्य टोळ्यांची धार्मिकता आर्यापेक्षा वेगळी होती. त्यांच्या जगण्याच्या एकूणच कल्पना भिन्न होत्या. ते निसर्गाची पूजा करीत. निसर्गातल्या आढळून येणाऱ्या आणि त्यांच्या बुद्धीला न उमगणाऱ्या वस्तूला, वृक्षाला किंवा पक्षाला ते देव मानीत. पूज्य मानलेल्या प्राण्याची शिकार ते करीत नसत. त्यांची ते पूजा करीत. सर्वच आदिवासी टोळ्या निसर्ग आणि प्राणीपुजक होत्या असेच आपल्याला दिसते. प्रत्येक टोळीचा प्रदेश ठरलेला असे. त्यावर समाज आणि टोळीने घातलेली बंधनं असत. बंधने मोडली की संघर्ष होत. ही गोष्ट फार प्राचीन नाही, तर अगदी शे-दोनशे वर्षांपर्यंत म्हणजे गोरा साहेब या देशात येईपर्यंत आदिवासींमध्ये अशी समाजरचना अस्तित्वात होती. आदिवासी जमातींचे हे समाज जीवन पाहून त्या काळचे इंग्रज अधिकारी, तत्कालीन धर्मोपदेशक आणि मानववंशशास्त्रज्ञ फार प्रभावित झाल्याचे त्यांनी केलेल्या नोंदीवरून दिसते.

इंग्रजी राजवट सुरु झाल्यानंतर चित्र हळूहळू बदलत गेले. सरकारी अधिकारी, ख्रिस्ती मिशनरी आणि मानववंशशास्त्रज्ञ या भागात फिरू लागले. शिरगणती करणाऱ्या त्या काळच्या अधिकाऱ्यांना आदिवासींची गणती नेमकी कोणत्या धर्मात करावी, असा प्रश्न पडला होता. हे लोक जरी हिंदुस्थानातले मूळ रहिवासी असले तरी हिंदू धर्मात त्यांचा समावेश झालेला नव्हता. त्या काळातल्या हिंदूंच्या चातुर्वण्य समाज पद्धतीत त्यांना कोठेच स्थान नव्हते. आदिवासींचे सांस्कृतिक आणि धार्मिक जीवन हिंदू लोकांपेक्षा वेगळे होते. त्यामुळे ब्रिटीश अधिकाऱ्यांनी त्यांची गणना प्राणी पूजक अशी केली आहे. पुढे जसजशी हिंदूशी सामाजिक आणि सांस्कृतिक देवाणघेवाण वाढली तसे जंगलाच्या या राजाचे हिंदूकरण होऊ लागले किंबहुना झाले. भारतीय मानवावंशशास्त्रज्ञांनी आदिवासी जमातीची काही ठळक अशी वैशिष्टये सांगितली आहेत. या जमातीचे स्वभाव विशेष नोंदवताना ते म्हणतात की, निसर्गाचं सानिध्य, लहानशा भागात केलेली वस्ती, स्वतंत्र स्वावलंबी आणि अत्यंत साधी राहणी, मोजक्या गरजा, साधी साधने-आयुधे, लिपीचा अभाव, मर्यादित आशा-आकांशा, रुढी, विधी, नातेवाईक, गावकरी यांचा व्यक्तीच्या जीवनावर विशेष प्रभाव दिसून येतो. त्याचबरोबर संकोची आणि बुजरी वृती हीदेखील या समाजाची वैशिष्ट्ये आहेत. भारतीय स्वातंत्र लढयाच्या इतिहासात बिरसा मुंडा यांनी बंडाचे नेतृत्व केले. यांचे स्थान महत्वपूर्ण आहे. त्यांनी ब्रिटीश सत्तेच्या राजकीय वर्चस्वाबरोबर आर्थिक आणि सामाजिक शोषणालाही आव्हान दिले. या क्रांतिकारकांच्या पावलावर पाऊल टाकत पुढे अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी देशभर निरनिराळ्या ठिकाणी क्रांतीची मशाल पेटवली. याचा फायदा १८५७ च्या उठावात झाला. यात सिद्धू कानहो मुर्मू या दोघा भावांचा प्रमुख सहभाग होता. १८५५ साली झालेल्या संथाळांच्या संग्रामाचे ते प्रमुख शिलेदार होते. त्याची सुरुवात, सध्याच्या झारखंडमधील साहिबगंज जिल्ह्यात झाली. बाबुराव शेडमाके या गोंड आदिवासी क्रांतिकारकाने त्याच सुमारास महाराष्ट्रात उठाव केला. तसेच नाग्या महादू कातकरी यांनी चिरनेर जंगल सत्याग्रह दिनांक २५ सप्टेंबर १९३० रोजी केला. मध्यप्रदेशात तंट्या भिल्ल यांनी संपूर्ण दशकभर ब्रिटिश राजवटीशी टक्कर दिली. त्यांच्या शौर्याची गाथा तितकीच महत्त्वपूर्ण आहे. विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या दशकात देशभर अशाच प्रकारचे उठाव झाले. मणिपूरची राणी गायडीनल्यू, रांचीमधील जतरा उरांव, सिक्कीम येथील हेलेन लेपचा, कुर्सेऑगमधील पुतलीमाया देवी तमांग, आंध्र प्रदेशचा अल्लुरी सिताराम राजू, ओरीसामधील लक्ष्मण नायक असे हजारो आदिवासी बंडकरी या सुमारास घडलेल्या क्रांतीयुध्दातील प्रमुख क्रांतिकारक होते.

१९१८ साली गुजरातमधल्या तापी जिल्ह्यात जन्मलेल्या दशरीबेन चौधरी यांची ऐतिहासिक गाथाही प्रेरणादायी आहे. महात्मा गांधींची भेट झाल्यावर त्या अगदी लहान वयात सत्याग्रहात सहभागी झाल्या. जयपाल सिंग मुंडा यांचीही गोष्ट अशीच रोचक आहे. ते हॉकीचे पूर्व कप्तान होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली जी संविधान सभा होती, त्यात त्यांनी आदिवासींचे प्रतिनिधित्व केले. आजच्या आदिवासी तरुणांनी संविधान सभेतील जयपाल सिंग मुंडा यांची भाषणे समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. एक आदिवासी म्हणून संविधानात त्यांना काय अपेक्षित होते आणि आज ते आदिवासींना मिळत आहे का याचा चिकित्सक अभ्यास झाल्यास आदिवासी चळवळींना योग्य दिशा मिळण्यास नक्की मदत होईल. सध्याच्या गुजरात आणि राजस्थान यांच्या सीमेवर गुरु गोवंद गिरी यांनी भरीव कामगिरी केली. ते सामाजिक आणि धार्मिक सुधारक होते. ते भिल्ल जमातीच्या हक्कांसाठी लढले. आदिवासींमध्ये त्यांनी जे योगदान दिले, त्याचा आजही सन्मानपूर्वक उल्लेख होतो. भगत चळवळ सुरु करण्याचे श्रेय त्यांच्याकडे जाते. तेलंगणा राज्यातील आदिलाबाद जिल्ह्यात असिफाबाद हे गाव आहे. तिथल्या कोमाराम भीम याने गोंड आदिवासींचे नेतृत्व करून उठाव केला. बिरसा मुंडा यांच्या उठावाची नोंद तर जगाने घेतलेली आहे. सह्याद्रीतील रामजी भांगरे, राघोजी भांगरे, रामा किरवा, हैबती खाडे, ढवळा आंगरे, रामा डगळे, होनाजी कैंगले, सत्तू मराडे, खेमा नाईक, जावजी बांबळे, ओतुरचे शेळकंदे पाटील, बापू भांगरे, बाळू पिचड, काशिराम किरवे, सखाराम सातपुते यांच्याही ऐतिहासिक बलिदानाची माहिती चिकित्सकपणे समजून घेणे ही काळाची गरज आहे. याचबरोबर १४ व्या शतकात जव्हार येथे राज्य निर्माण करणारे जायबा मुकणे यांचाही इतिहास आपणास माहीत असणे आवश्यक आहे.

सह्याद्रीत असलेली एक प्रमुख जमात म्हणून ठाकर समाज आपली वेगळी ओळख जपून आहे. या जमातीने राघोजी आंगरे यांची कोणतीही माहिती इंग्रज सरकारला देणार नाही अशी सामुदायिक शपथ घेतली होती. हि देखील एक महत्वपूर्ण ऐतिहासिक बाब आहे. याचीही पार्श्वभूमी व महत्व समजुन घेणे तितकेच आवश्यक आहे. खानदेशातील भिल्ल नायकांचे योगदान देखील अतिशय गौरवशाली आहे. सातमाळा प्रदेशातील भिल्लांचा प्रमुख चिल नाईक, जोंधळ्या नाईक, जाकि-या नाईक, सुभान्या नाईक, खाज्या नाईक, भागूजी नाईक, काजीसिंग नाईक अशा अनेक क्रांतिवीरांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान जनमाणसात पोहचले त्यासाठी प्रयत्न होणे ही काळाची गरज आहे.

वारली उठाव, भिल्ल पोलिस कॉर्प, भिल्ल एजंट, छोटा नागपूर प्रदेशातील आदिवासी विद्रोह, तमार बंड, संथाळ हुल, देवी गुजरात चळवळ, मिदनापुर आदिवासी चळवळ, मालदामधील जितू संथाल चळवळ अशा काही मुख्य वसाहतवाद विरोधी आदिवासी चळवळी व उठाव समजून घेणे आवश्यक आहे.

एंजेल वन ६९.९८ लाख ॲक्टिव्ह क्लायंटसह बनली भारतातील दुसऱ्या क्रमांकाची स्टॉकब्रोकिंग कंपनी

ऑक्टोबरमध्ये २.४३ लाख नवीन ॲक्टिव्ह क्लायंट जोडले; एकूण क्लायंटची संख्या ४ कोटींच्या पुढे

■ मुंबई (दै. संध्या)

एनएसईच्याताज्याReport1Cनुसार,एंजेलवन लिमिटेड(एनएसई: एंजेलवन,बीएसई:543235) ही ॲक्टिव्ह क्लायंटच्या संख्येनुसार भारतातील दुसऱ्या क्रमांकाची स्टॉकब्रोकिंग कंपनी बनली आहे. ऑक्टोबर 2026 अखेर कंपनीकडे 69.98 लाख ॲक्टिव्ह क्लायंट होते. एनएसई वरील एकूण 4.67 कोटी ॲक्टिव्ह क्लायंटपैकी कंपनीचा वाटा 14.97 टक्के आहे. ऑक्टोबर महिन्यात एंजेल वन ने एनएसई वर 2.43 लाख नवीन नेट ॲक्टिव्ह क्लायंट जोडले. यावरून रिटेल गुंतवणूकदारांचा सहभाग आणि टेक्नॉलॉजीच्या मदतीने गुंतवणूक करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या प्लॅटफॉर्मचा वाढता वापर दिसून येतो. ऑक्टोबर 2026 मध्ये कंपनीच्या एकूण क्लायंटची संख्या वार्षिक आधारावर 17.4 टक्क्यांनी वाढून 4.06 कोटी



झाली. अशा प्रकारे कंपनीने याच महिन्यात 4 कोटी क्लायंटचा महत्त्वाचा टप्पा पार केला. तसेच, कंपनीने या महिन्यात 6.6 लाख नवीन क्लायंट जोडले. गेल्या नऊ महिन्यांतील ही सर्वाधिक संख्या आहे. हा महत्त्वाचा टप्पा भारताच्या कॅपिटल मार्केटमध्ये एंजेल वन ची वाढती उपस्थिती दर्शवतो. गुंतवणूकदारांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी कंपनी आपल्या प्रॉडक्ट्स आणि सेवांमध्ये सातत्याने वाढ करत आहे. इक्विटी, म्युच्युअल फंड, कॉर्पोरेट बॉन्ड्सपासून ते वेल्थ मॅनेजमेंट आणि अमेरिकन शेअर्समधील गुंतवणुकीपर्यंत विविध सेवा कंपनी देत आहे. अशा प्रकारे एंजेल वन एक सर्वसमावेशक आणि टेक्नॉलॉजीवर आधारित फायनान्शियल सर्व्हिसेस प्लॅटफॉर्म तयार करत आहे. SIP रजिस्ट्रेशनमध्ये झालेल्या नवीन वाढीमध्येही कंपनीचा वाटा दुसऱ्या क्रमांकावर राहिला आहे. यावरून रिटेल गुंतवणूकदारांचा या प्लॅटफॉर्मवरील वाढता विश्वास दिसून येतो. विविध गुंतवणूक पर्याय उपलब्ध करून देण्यासोबतच सर्वसामान्यांना गुंतवणुकीच्या संधी सहज उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने एंजेल वन काम करत आहे. त्यामुळे प्रत्येक गुंतवणूकदाराच्या आर्थिक प्रवासासाठी एकाच ठिकाणी सर्व सेवा उपलब्ध करून देणारे प्लॅटफॉर्म म्हणून कंपनी आपले स्थान अधिक मजबूत करत आहे.

रांगोळीपासून आकाशापर्यंत : आशीर्वादने सणातील सर्जनशीलतेला दिली नवी ओळख

■ सात विजेत्यांच्या रांगोळ्या आता बिलबोर्डवर झळकणार

■ १,००० सहभागी जिंकले सोन्या-चांदीची नाणी आणि Amazon व्हाउचर्स

■ पुणे (दै. संध्या)

या दिवाळीत सात रांगोळी कलाकृती ज्या घरांमध्ये साकारल्या, त्या घरांच्या चौकटीबाहेर पडून आता देशभरातील बिलबोर्डच्या मोठ्या सार्वजनिक कॅनव्हासवर झळकणार आहेत. आशीर्वादच्या 'घर लाएं आशीर्वाद'च्या दुसऱ्या पर्वांतर्गत, विजेत्या रांगोळ्या पुणे येथे एक आठवडा बिलबोर्डवर प्रदर्शित केल्या जातील. त्यामुळे सहभागी कलाकारांना आपल्या शहरातच स्वतःची सणासुदीची कल्पकता मोठ्या स्वरूपात साजरी होताना पाहता येईल.

पहिल्या पर्वाच्या यशानंतर, 'घर लाएं आशीर्वाद – 2'ने कुटुंबांसाठी WhatsAppवर एक आकर्षक अनुभव उपलब्ध करून दिला. सहभागी स्वतः तयार केलेल्या रांगोळ्या शेअर करू शकत होते किंवा AIच्या मदतीने डिझाइन तयार करून लोकप्रिय अभिनेत्री रूपाली गांगुली यांच्याकडून वैयक्तिक सणाच्या शुभेच्छा मिळवू शकत होते.

या मोहिमेला देशभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आणि 50,000 हून अधिक प्रवेशिका



आल्या. कुटुंबांनी आपली सर्जनशीलता दाखवण्यासाठी आणि रांगोळीची जपलेली परंपरा आपल्या खास पद्धतीने साजरी करण्यासाठी या उपक्रमाचा वापर केला. निवडक कलाकृती घरांमधून बिलबोर्डवर नेत, आशीर्वादने वैयक्तिक सणोत्सवी अभिव्यक्तीचे रूपांतर सर्व समुदायांना पाहता आणि साजरे करता येईल अशा भव्य प्रदर्शनात केले. या उपक्रमाविषयी श्री. अनुज रुस्तगी, बिझनेस युनिट चीफ एक्झिक्युटिव्ह – स्टेपल्स, फूड्स डिव्हिजन, ITC लिमिटेड म्हणाले, "दिवाळी हा भारतातील सर्वात मोठा सण आहे आणि घरासमोर रांगोळी काढून सजावट करणे हा या उत्सवाचा अविभाज्य भाग आहे. 'घर लाएं आशीर्वाद'च्या दुसऱ्या पर्वातून आम्ही या जपलेल्या परंपरेचा आणि गृहिणींच्या सर्जनशीलतेचा गौरव करत आहोत, सात विजेत्या डिझाइन्स बिलबोर्डवर प्रदर्शित करून. मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद या परंपरेतून मिळणारा आनंद दाखवतो. विजेत्यांचे अभिनंदन आणि हा उत्सव संस्मरणीय करणाऱ्या प्रत्येक सहभागीचे आम्ही आभार मानतो."

भारतातील फिक्स्ड ब्रॉडबँड सेवांमध्ये एअरटेल आघाडीवर

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

भारतातील होम ब्रॉडबँड सेवांच्या कामगिरीत भारती एअरटेलने चांगली कामगिरी करत नोव्हेंबर २०२६ च्या Opensignal च्या इंडिया फिक्स्ड ब्रॉडबँड एक्सपीरियन्स अहवालात पाचही श्रेणींमध्ये पहिले स्थान मिळवले आहे. नेटवर्क ॲनालिटिक्स क्षेत्रातील Opensignal या संस्थेने एअरटेल, रिलायन्स जिओ आणि भारत संचार निगम लिमिटेड (BSNL) यांच्या ब्रॉडबँड सेवेचे इंटरनेट स्पीड, नेटवर्कची विश्वासार्हता, अपलोड स्पीड, डाउनलोड स्पीड आणि व्हिडिओ अनुभव अशा वेगवेगळ्या निकषांवर मूल्यांकन केले आहे. अहवालानुसार, नेटवर्कच्या विश्वासार्हतेच्या बाबतीत एअरटेलला ४८६ गुण मिळाले आहेत. जिओला ४२३ तर बीएसएनएलला ४१९ गुण मिळाले. इंटरनेट स्पीडमध्येही एअरटेलने चांगली कामगिरी केली. एअरटेलचा सरासरी डाउनलोड स्पीड ३८.४ Mbps आणि अपलोड स्पीड २६.७ Mbps नोंदवण्यात आला. बीएसएनएलचा डाउनलोड स्पीड ३७.९ Mbps आणि अपलोड स्पीड २५.९

■ Opensignal च्या अहवालात पाचही श्रेणींमध्ये अव्वल स्थान

Mbps, तर जिओचा डाउनलोड स्पीड ३०.५ Mbps आणि अपलोड स्पीड २१ Mbps होता. फिक्स्ड वायरलेस ॲक्सेस (FWA) या प्रकारच्या ब्रॉडबँड सेवेतही एअरटेलने पाचही श्रेणींमध्ये पहिले स्थान मिळवले. या सेवेत एअरटेलचा सरासरी डाउनलोड स्पीड ३२.४ Mbps आणि अपलोड स्पीड २०.७ Mbps होता. जिओचा डाउनलोड स्पीड २५.७ Mbps आणि अपलोड स्पीड १७.१ Mbps नोंदवण्यात आला. नेटवर्कच्या विश्वासार्हतेतही एअरटेलला ४५० गुण मिळाले, तर जिओला ३८२ गुण मिळाले. दैनंदिन इंटरनेट वापरासाठी आवश्यक असलेल्या नेटवर्कच्या स्थिर कामगिरीतही एअरटेल पुढे असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. एअरटेलचा FWA Consistent Quality स्कोअर ६६.२ टक्के होता, तर जिओचा ५५ टक्के होता. ऑनलाइन शिक्षण, व्हिडिओ कॉलिंग, मनोरंजन आणि घरून काम करण्यासाठी चांगल्या दर्जाचे इंटरनेट कनेक्शन किती महत्त्वाचे आहे, हे यातून स्पष्ट होते.

जाहीर नोटीस

आमचे अशिल मोहम्मद इलयास उस्मान मोमीन रा. रूम नं २ चाळ नं ३१६ दाया अमरसी चाळ, बाजार रोड, बांद्रा वेस्ट, मुंबई- ४०० ०५० यांनी दिलेल्या माहिती वरून दाखवलेल्या कागदपत्रावरून जाहीर नोटीस देण्यात येते ती खालीलप्रमाणे :-

गाव मौजे आळे येथील खाते क्र ३५५३ मधील गट नं २९८९/२९९३ बिन शेती क्षेत्र १६२.७६.०५ चौ.मी. हे. आर आकार १६२७.६० रु पै या मिळकत बाबत आमचे अशिल व इतर ९ यांनी दि. १४/०८/२०२५ रोजी मा. दिवाणी न्यायालय अथवा महसूल अधिकारी साहेब यांचे कडे कायदेशीर कामी श्री. समीर राजाराम गुंजाळ यांना करून दिलेले मुखत्यार पत्र नोटरी दस्त १२१/२०२५ हा रद्द केला असून त्या अनुषंगाने आमचे अशिल व इतर ९ यांनी दि. १८/११/२०२५ रोजी मुखत्यार पत्र रद्द लेख नोटरी दस्त क्र १५५/२०२५ केला असून सदर स्ताद्वारे श्री. समीर राजाराम गुंजाळ यांना मुखत्यार पत्राद्वारे देण्यात आलेले सर्व अधिकार काढून घेण्यात आलेले आहे.

तरी या जाहीर नोटीसी द्वारे दवंडी देण्यात येते कि,

सदर वर नमूद मिळकत बाबत दि. १८/११/२०२५ रोजीच्या मुखत्यार पत्र रद्द लेख नोटरी दस्त क्र १५५/२०२५ प्रमाणे श्री. समीर राजाराम गुंजाळ यांना मुखत्यार पत्राद्वारे देण्यात आलेले सर्व अधिकार काढून घेण्यात आलेले आहे. आमचे अशिल व इतर इसमांच्या वतीने कोणतेही कृत्य अवैध व अमान्य असेल व सदरचे कृत्य आमचे अशिल यांच्या वर बंधनकारक नसेल याची नोंद घ्यावी.

नोटीस देणार
सही/-

ॲडव्होकेट
ॲड. इनामदार रसल गफर
Mob-9096061445
adv.inamdarrasul313@gmail.com

'ओरगाटेक इंडिया २०२६'चे १९ नोव्हेंबरपासून आयोजन

■ मुंबई (दै. संध्या)

ऑफिस फर्निचर, कार्यस्थळ डिझाइन आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रमुख व्यावसायिक प्रदर्शन 'ओरगाटेक इंडिया २०२६'चे आयोजन १९ ते २१ नोव्हेंबरदरम्यान मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे करण्यात येणार आहे. या तीन दिवसीय प्रदर्शनात १० देशांतील १०० हून अधिक जागतिक ब्रँड्स सहभागी होणार आहेत. कोकुयो, हेवर्थ, नीलकमल एज, गोदरेज इंटिरिओ, फेदरलाइट आणि डोरमाकाबा यांसारख्या कंपन्या आधुनिक उत्पादने सादर करतील. प्रदर्शनात एर्गोनॉमिक खुर्च्या, मॉड्युलर ऑफिस फर्निचर, स्मार्ट लाइटिंग, ध्वनी व्यवस्था, फ्लोअरिंग, ऑटोमेशन आणि आयओटी आधारित स्मार्ट वर्कप्लेस सोल्युशन्स पाहण्याची संधी मिळणार आहे. यासोबतच विशेष नॉलेज प्लॅटफॉर्मवर देश-विदेशातील आर्किटेक्ट्स, डिझायनर्स आणि कार्यस्थळ तज्ज्ञ भविष्यातील कार्यालयांच्या संकल्पनांवर चर्चा करणार आहेत. यंदाच्या प्रदर्शनाची 'वर्कनेक्स्ट – डिझाइन, टेक्नॉलॉजी, एक्सपिरियन्स' ही संकल्पना आहे.

महाराष्ट्र शासन

क्रीडा विभाग
क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
शिवछत्रपती क्रीडा संकुल, महाळुंगे-बालेवाडी, पुणे-४११ ०४५.
संकेतस्थळ: https://sports.maharashtra.gov.in ई-मेल: desk11.dsys-mh@gov.in, mahakridapeeth@gmail.com

जाहिरात क्रमांक : ०२ सन २०२६ दिनांक : १६ नोव्हेंबर, २०२६

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागाच्या नियंत्रणाखालील क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे हे विधी सल्लागार सेवा उपलब्ध करुन घेण्यासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागवित आहेत.

पात्र विधी सल्लागार यांनी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या https://sports.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरुन दिनांक १६ नोव्हेंबर, २०२६ पासून दिनांक ३० नोव्हेंबर, २०२६ या कालावधीत अर्ज डाऊनलोड करुन घेऊन दिनांक ०३ डिसेंबर, २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत कार्यालयात जमा करावा. विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज कोणत्याही कारणास्तव स्वीकारले जाणार नाहीत.

कोणतेही कारण न देता अर्ज स्वीकारणे अथवा नाकारण्याचे सर्व अधिकार, आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य हे राखून ठेवीत आहेत.

स्थळ:- पुणे
दिनांक:- १६ नोव्हेंबर, २०२६

स्वाक्षरीत/-
(दीपक सिंगला)
आयुक्त,
क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.

विमाका/पुणे/जाहि./२०३/२०२६-२७

महाराष्ट्र राज्यातील पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील मौजे करंदी, ता. शिरूर येथील तळेगाव- चाकण-शिक्रापूर महामार्ग राष्ट्रीय महामार्ग क्रं ५४८ डी रस्त्यातील कि.मी. ०/००० ते ५३/२०० मधील लांबीत कि.मी.०/०० ते २६/३०० मध्ये चार पदरी उन्नत मार्ग व जमिनीस समांतर चारपदरी रस्ता व चाकण ते शिक्रापूर सा.क्र.कि.मी. २६/३०० ते ५३/३०० या लांबीमध्ये जमिनीस समांतर चारपदरी रस्ता करणेसाठी खाजगी जमिनी वाटाघाटीद्वारे थेट खरेदीने संपादन करणेबाबत जाहीर नोटीस.

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र.१७ पुणे
जिल्हाधिकारी कार्यालय, बी विंग,
दूसरा मजला, पुणे ४११ ००१.
Email - sla०१७pune@gmail.com
क्र.उपजि/१७/एसआर/ १०/२०२६

ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते पायाभूत सुविधा विकास महामंडळ, विभाग पुणे जि.पुणे यांनी महाराष्ट्र राज्यतील पुणे जिल्हयातील शिरूर तालुक्यातील मौजे करंदी, ता. शिरूर येथील तळेगाव- चाकण-शिक्रापूर महामार्ग राष्ट्रीय महामार्ग क्रं ५४८ डी रस्त्यातील कि.मी. ०/००० ते ५३/२०० मधील लांबीत कि.मी.०/०० ते २६/३०० मध्ये चार पदरी उन्नत मार्ग व जमिनीस समांतर चारपदरी रस्ता व चाकण ते शिक्रापूर सा.क्र.कि.मी. २६/३०० ते ५३/३०० या लांबीमध्ये जमिनीस समांतर चारपदरी रस्ता करणेसाठी खाजगी जमिनी वाटाघाटीद्वारे थेट खरेदीने संपादन करणेबाबत महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२ दिनांक १२ मे २०१५ व त्याअनुषंगाने पारित झालेल्या विविध शासन निर्णय /परिपत्रकामधील तरतुदीस अनुसरून खाजगी क्षेत्रातील जमिनी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते पायाभूत सुविधा विकास महामंडळ, विभाग पुणे जि. पुणे यांचे नावे घेण्यासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडील आदेश क्र. पीएलसी/सीआर/८८/२०२६, दि. १४/१०/२०२६ अन्वये उक्त प्रस्तावा संबंधी उक्त शासन निर्णय दिनांक १२ मे, २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ आणि तनुषंगिक शासन निर्णय, तसेच शासन परिपत्रक, महसूल व वनविभाग क्र. एलक्यूएन-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दिनांक २५ जानेवारी, २०१७ प्रमाणे भूसंपादनाची कार्यवाही करण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र.१७) पुणे यांना प्राधिकृत केले आहे.

त्याअर्थी, आता

१. उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार मी, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. १७) पुणे याद्वारे, खालील अनुसूचीमध्ये नमूद खाजगी जमीनी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने कार्यकारी अभियंता, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते पायाभूत सुविधा विकास महामंडळ, विभाग पुणे जि. पुणे यांचे नावे संपादन करणेबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे.

२. जमीनी थेट खरेदीने संपादन करण्यापूर्वी जिल्हास्तरीय समितीमार्फत नवीन भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेड्युल-१ च्या तरतुदीनुसार व महाराष्ट्र शासनाकडील दि. १२/०५/२०१५ व त्या अनुषंगाने पारित झालेल्या विविध शासन निर्णय / परिपत्रकानुसार मोबदला निश्चित करण्यात येईल.

३. उक्त संपादन करावयाच्या जमिनीचा भूसंपादन प्रस्तावानुसार आराखडा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. १७) पुणे यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आले आहेत.

४. तसेच सदर जमिनीमध्ये अधिकार अभिलेखातील इसमांव्यतिरिक्त इतर कोणाचे काही हक्क, हितसंबंध असल्यास, मालकी हक्काबाबत कोणत्याही स्वरुपाचा वाद सुरु असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आंत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. १७) पुणे यांचे कार्यालय जिल्हाधिकारी कार्यालय, बी विंग, दुसरा मजला, पुणे ४११ ००१ येथे कागदोपत्री पुराव्यांसह दाखल कराव्यात अन्यथा सदर जमिनी निर्वेध/निर्जोखमी आहेत असे समजून सद्यस्थितीतील अधिकार अभिलेखातील विद्यमान जमिन मालकांकडून खरेदी करणेची पुढील कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.

अनुसूची

थेट खरेदीने संपादन करावयाच्या जमिनींचा तपशील

मौजे करंदी, ता. शिरूर, जि. पुणे

अ. क्र.	गट क्र./ स.नं.	संपादित करावयाचे क्षेत्र (हे.आर.चौ.मी.)
१	७२०	०.१५५३
२	७१३	०.००५७
३	७२२	०.१२३९
४	७२१	०.१०८६
५	७२१/२/१	
६	७२१/२/२	
७	७२१/३	
८	७६१	०.०५०९
९	७६०	०.११२८
१०	७५९	०.१०५२
११	७५८	०.०१६२
१२	७४३	०.०४१८
१३	७६२	०.०१७५
१४	रस्ता_लगत गट ७२०, ७६२, ७१९, ७६१	०.५४९८
	एकुण :	१.२८७७

टीप :- वरील तक्त्यात भूसंपादन प्रस्तावानुसार गट नंबर व संपादन क्षेत्र नमूद केले आहे. तथापी उपअधिक्षक भूमि अभिलेख, शिरूर यांचे कार्यालयाकडून संयुक्त मोजणी होवून अहवाल प्राप्त झालेनंतर त्यानुसार भूसंपादनाची कार्यवाही करणेत येईल.

ठिकाण :- पुणे
दिनांक :- /११/२०२६

सही/-
(अमिता तळेकर)
उपजिल्हाधिकारी
(भूसंपादन क्र. १७) पुणे

जिमाका/पुणे/जाहिरात/३३७/२०२६-२०२७



पिंपरी-चिंचवड आणि परिसर
रविवार, दि. १५ नोव्हेंबर २०२६
दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

थोडक्यात पण महत्वाचे



स्व.वसंतदादा पाटील यांच्या जयंतीनिमित्त काँग्रेसच्या वतीने अभिवादन

सांगवी : दैनिक संध्या

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, ज्येष्ठ काँग्रेस नेते आणि सहकार क्षेत्रातील अग्रणी स्वर्गीय वसंतदादा पाटील यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने त्यांच्या सांगवी येथील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. "वसंतदादा पाटील यांनी महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि सहकार क्षेत्रात मोलाचे योगदान दिले, सहकारी साखर कारखान्यांच्या माध्यमातून ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासाला चालना देण्याचे ऐतिहासिक कार्य त्यांनी केले. शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या हिताला प्राधान्य देणारे त्यांचे नेतृत्व महाराष्ट्राच्या इतिहासात सदैव स्मरणात राहील. "वसंतदादांचे विचार, सहकाराचा वारसा आणि सर्वसामान्यांच्या विकासाचा ध्यास पुढे नेणे हीच त्यांना खरी आदरांजली आहे," असे मत यावेळी शहराध्यक्ष नरेंद्र बनसोडे यांनी व्यक्त केले. यावेळी काँग्रेसचे शहराध्यक्ष नरेंद्र बनसोडे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी शिक्षण मंडळाचे माजी सभापती अभिमन्यू दहीतुले, काँग्रेसचे सरचिटणीस विल्यम साळवी, रामकिसन माने, हरीश डोळस, देवदत्त रानवडे, नितीन सोनवने, रितिका शर्मा व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी उपस्थित काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी वसंतदादांच्या कार्याचे स्मरण करून त्यांना विनम्र अभिवादन केले.

महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स' चित्रपटाच्या नावातून 'महाराष्ट्र' शब्द वगळा

पिंपरी: दैनिक संध्या

'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स' या प्रस्तावित चित्रपटाच्या शीर्षकातून 'महाराष्ट्र' हा शब्द वगळून चित्रपटाचे नाव बदलण्यात यावे, अशी मागणी पिंपरी-चिंचवड महापालिकेचे विरोधी पक्षनेते तथा अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पिंपरी-चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी निवेदन दिले आहे. 'महाराष्ट्र' हे नाव छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा पराक्रम, राजर्षी शाहू महाराजांचा सामाजिक न्याय, महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे समतावादी विचार तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानिक मूल्यांची गौरवशाली परंपरा सांगणारे आहे. अशा ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिक अस्मितेच्या प्रतीक असलेल्या महाराष्ट्राचे नाव एखाद्या गुन्हेगारी प्रवृत्तीशी संबंधित विषयाला जोडणे योग्य नसल्याचे भोईर यांनी निवेदनात म्हटले आहे. महिलांवरील लैंगिक अत्याचार, शोषण आणि समाजातील अनिष्ट प्रवृत्तींविरोधात जनजागृती करणे ही काळाची गरज आहे. अशा गंभीर विषयांवर चित्रपटाच्या माध्यमातून समाजप्रबोधन होत असेल, तर त्याचे स्वागतच केले पाहिजे. मात्र, अशा विषयाला संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे नाव जोडल्याने राज्याच्या सांस्कृतिक प्रतिष्ठेला धक्का पोहोचू शकतो, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे. साहित्य, नाटक आणि चित्रपट ही केवळ मनोरंजनाची माध्यमे नसून समाजमन घडविणारी आणि सामाजिक परिवर्तनाला दिशा देणारी प्रभावी साधने आहेत. कलात्मक अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा आदर राखतानाच महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वारशाचा, सांस्कृतिक प्रतिष्ठेचा आणि जनभावनांचाही सन्मान राखला गेला पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले. लोकप्रतिनिधी तसेच मराठी साहित्य व नाट्य क्षेत्रातील पदाधिकारी या नात्याने महाराष्ट्राच्या अस्मितेचे जतन करणे ही आपली नैतिक आणि सामाजिक जबाबदारी आहे. त्यामुळे 'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स' या प्रस्तावित चित्रपटाचे शीर्षक बदलून त्यातून 'महाराष्ट्र' हा शब्द वगळण्यात यावा, अशी ठाम मागणी भाऊसाहेब भोईर यांनी केली आहे.

१६ वर्षीय मुलावर कोयत्याने वार; दोघांकडून परिसरात दहशत, एकाला अटक

पिंपरी: दैनिक संध्या

काळेवाडी येथील पाचपीर चौकाजवळ एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलाला शिवीगाळ करून मारहाण करण्यात आली. त्यानंतर एका तरुणाने लोखंडी कोयत्याने मुलाच्या डाव्या हातावर वार करून त्याला जखमी केले. या घटनेनंतर दोघांनी हातातील कोयता हवेत फिरवत नागरिकांमध्ये दहशत निर्माण केली. याप्रकरणी काळेवाडी पोलिसांनी दोघांविरोधात गुन्हा दाखल केला असून, एका आरोपीला अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना काळेवाडीतील शंभर चाळ, पाचपीर चौकाजवळील ऑक्सिगर हॉस्पिटलसमोर घडली. फिर्यादी १६ वर्षीय मुलगा पायी जात असताना आरोपी वैभव देवीदास गणगोपाळ (वय १९) याने त्याला शिवीगाळ करून डावा हात पकडत मारहाण केली. त्यावेळी फिर्यादीने तेथून पळून जाण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने त्याला दोन्ही हातांनी पकडून ठेवले. याचवेळी दुसरा आरोपी गौरव चंद्रकांत साळवे (वय १९) याने कमरेला लावलेला लोखंडी कोयता काढून फिर्यादीच्या डाव्या हातावर वार केला. त्यानंतर दोन्ही आरोपींनी कोयता हवेत फिरवत, "कोणीही मध्ये येणार नाही, कोणी मध्ये आल्यास त्याला सोडणार नाही," अशी धमकी देत परिसरात दहशत निर्माण केली. या प्रकरणी काळेवाडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता तसेच भारतीय शस्त्र अधिनियम आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी वैभव गणगोपाळ याला पोलिसांनी अटक केली असून, दुसऱ्या आरोपीचा सहभाग तपासला जात आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक नलावडे करीत आहेत.

जुन्या पोलिस ठाण्यावर दगडफेक

लोणावळा : दैनिक संध्या

लोणावळा शहरातील जुन्या पोलिस ठाण्यावर अज्ञात व्यक्तीने दगडफेक करत अधिकारी कक्षाच्या काचा फोडल्या आहेत. 6 जुलै रोजी लोणावळा शहरात मोठ्या प्रमाणात पूर आला होता. त्या पुराचा फटका पोलिस ठाण्यालादेखील बसला. पोलिस ठाण्यातदेखील पाणी घुसल्याने लोणावळा बाजारातील पोलिस ठाण्याचे नवीन इमारतीमध्ये स्थलांतरण करण्यात आले होते. तेव्हापासून बाजार भागातील पोलिस ठाणे हे रिकामे होते. त्याठिकाणी पोलिस नाहीत याचा अंदाज घेत कोणीतरी अज्ञात व्यक्तीने पोलिस ठाण्यावर दगडफेक करत अधिकारी कक्षाच्या काचा फोडल्या आहेत. लोणावळा बाजार भागातील वाहतूक कोंडी व त्या परिसरात कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या निमित्ताने जुने पोलिस ठाणे हे पुन्हा कार्यान्वित करत त्या ठिकाणी अधिकारी व कर्मचारी नियुक्त करणार असल्याचे प्रभारी पोलिस निरीक्षक महेश विधाते यांनी सांगितले होते. मागील दोन तीन महिन्यांपासून पोलिस ठाणे हे रिकामी असल्यामुळे त्याची साफसफाई व स्वच्छता करत लवकरात लवकर ते पुन्हा कार्यान्वित करण्यात येणार आहे. या अनुषंगाने पोलिस ठाण्याची पाहणी केली असता अधिकारी एक कक्षाच्या काचा कोणीतरी दगडफेक करून फोडल्याचे दिसून आले. सर्व कक्ष हे रिकामे पडल्यामुळे कचऱ्याने भरले आहेत. अधिकारी कक्षाच्या काचांवर ही दगडफेक नेमकी कोणी केली, याबाबत कोणतीही माहिती उपलब्ध नसली तरी झालेली घटना ही निंदनीय आहे. पोलिस हे शहराचे व नागरिकांचे रक्षणकर्ते आहेत. त्यांच्यामुळेच शहरात कायदा व सुव्यवस्था राखली जाते.

हातचलाखीने दागिने चोरणाऱ्या महिलेसह दोघांना अटक

वाकड येथील पी.एन.जी. ज्वेलर्समध्ये चोरी; ६ लाख ३८ हजारांचा मुद्देमाल जप्त

■ वाकड (दै. संध्या)



गर्दीचा फायदा घेत दुकानातील कर्मचाऱ्यांना बोलण्यात गुंतवून हातचलाखीने सोन्याचे दागिने चोरी करणाऱ्या सराईत महिला आरोपीसह दोघांना वाकड पोलिसांनी अटक केली आहे. या आरोपींकडून दोन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले असून, एकूण ६ लाख ३८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

वाकड येथील भूमकर चौकातील पु. ना. गाडगीळ (पी.एन.जी.) ज्वेलर्समध्ये दसऱ्याच्या मुहूर्तावर २० ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास ही चोरी झाली होती. दुकानात गर्दी असताना आरोपींनी कर्मचाऱ्यांना बोलण्यात गुंतवून ४ लाख ५० हजार रुपये किमतीचे २९.८४३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र हातचलाखीने लंपास केले होते. याप्रकरणी वाकड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

याच पद्धतीने १९ एप्रिल २०२६ रोजी अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर पी.एन.जी. ज्वेलर्समध्ये गर्दीचा फायदा घेत १ लाख ८८ हजार रुपये किमतीचे ११.३७६ ग्रॅम वजनाचे शॉर्ट मंगळसूत्र चोरी करण्यात आले होते. याप्रकरणीही वाकड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या दोन्ही गुन्ह्यांचा तपास करताना वाकड पोलिसांच्या तपास पथकाने दुकानातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. मात्र, आरोपींचा ठोस मागमूस लागत नव्हता. त्यानंतर पोलिसांनी भूमकर चौकातील पी.एन.जी. ज्वेलर्सपासून कोंढवा आणि केशवनगरपर्यंतच्या मार्गावरील सरकारी तसेच खासगी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची सलग पाहणी केली. या तपासातून चोरीसाठी वापरण्यात आलेल्या चारचाकी वाहनाची ओळख पटवून आरोपींच्या हालचालींचा माग काढण्यात आला.पोलिसांचा ससेमिरा मागे लागल्याचे लक्षात येताच आरोपी दुसऱ्या राज्यात जाऊन लपून बसले होते. मात्र, पोलिसांनी तांत्रिक तपास आणि गुप्त बातमीदारांच्या मदतीने त्यांच्यावर नजर ठेवली. आरोपी महाराष्ट्रात परतताच सापळा रचून त्यांना ताब्यात घेण्यात आले. या कारवाईत धनराज विजय परमार (वय ४८, रा. केशवनगर, मुंढवा, पुणे) याला ११ नोव्हेंबर २०२६ रोजी अटक करण्यात आली. त्यानंतर तपासात निष्पन्न झालेली महिला आरोपी सुचित्रा किशोर साळुंखे (वय ५५, रा. शिंदेवस्ती, केशवनगर, पुणे) हिला १२ नोव्हेंबर रोजी अटक करण्यात आली. दोन्ही आरोपींची पोलीस कोठडी घेऊन त्यांच्याकडून चोरीस गेलेला संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.ही कामगिरी वाकड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विठ्ठल साळुंखे, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीनिवास दरादे, पोलीस उपनिरीक्षक मारणे तसेच पोलीस अंमलदार दळे, वंदू गिरे, मो. नदाफ, विजय मोरे, सचिन गायकवाड, दीपक साबळे, विजय घाडगे, विजय भुसारे, विक्रम भगत, कौस्तेय खराडे, ज्ञानदेव झेंडे, कारभारी पालवे, समाधान कांबळे, प्रमोद गायके, अभिषेक मांडे आणि मंगेश लोखंडे यांच्या पथकाने केली आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीनिवास दरादे करीत आहेत.

राष्ट्रीय एकता दौड, 'सोल्जरॅथॉन'साठी पुणे मेट्रो पहाटे ३:४० पासून धावणार!

■ पिंपरी(दै. संध्या)



पुणे शहरात रविवार, दि.१५ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या 'राष्ट्रीय एकता दौड' (Run for Unity) आणि 'Soldierathon' या दोन प्रमुख मॅरेथॉन स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या धावपटूंसाठी पुणे मेट्रो प्रशासनाने विशेष व्यवस्था केली आहे. धावपटू आणि नागरिकांच्या सोयीसाठी या दिवशी पुणे मेट्रोची सेवा पहाटे ३:४० वाजल्यापासून सुरू करण्यात येणार आहे.

या विशेष व्यवस्थेमुळे मॅरेथॉनमध्ये सहभागी होणाऱ्या हजारो धावपटूंना वेळेत स्पर्धेच्या ठिकाणी पोहोचणे शक्य होणार आहे. तसेच शहरातील वाहतूक कोंडी टाळून सार्वजनिक वाहतुकीचा वापर करण्यास प्रोत्साहन मिळणार आहे.

रविवारी पहाटे ३:४० वाजता रामवाडी, वनाझ, पीसीएमसी आणि स्वारगेट या चार टर्मिनल स्थानकांवरून पहिली मेट्रो सुटणार आहे. पहाटे ३:४० ते सकाळी ६ वाजेपर्यंत पुणे मेट्रोच्या दोन्ही मार्गिकांवर दर २० मिनिटांनी मेट्रो उपलब्ध असेल. धावपटूंची विशेष सोय लक्षात घेऊन जिल्हा न्यायालय इंटरचेंज मेट्रो स्थानकातून पीसीएमसी आणि वनाझच्या दिशेने दर १० मिनिटांनी अतिरिक्त मेट्रो फेऱ्या चालविण्यात येणार आहेत. राष्ट्रीय एकता दौडमध्ये सहभागी होणाऱ्या धावपटूंना वनाझ मार्गिकेने लोकमान्य टिळक चौक (अलका चौक) येथे पोहोचता येणार आहे. तर 'Soldierathon' मध्ये सहभागी होणाऱ्या धावपटूंना पीसीएमसी मार्गिकेने संबंधित कार्यक्रमस्थळी जाण्यासाठी सुविधा उपलब्ध होणार आहे.

अशी असेल विशेष मेट्रो सेवा : मार्गिका १ : पीसीएमसी ते स्वारगेट – दर २० मिनिटांनी. मार्गिका २ : वनाझ ते रामवाडी – दर २० मिनिटांनी. जिल्हा न्यायालय ते पीसीएमसी – दर १० मिनिटांनी अतिरिक्त सेवा. जिल्हा न्यायालय ते वनाझ – दर १० मिनिटांनी अतिरिक्त सेवा. तसेच पीसीएमसी-स्वारगेट आणि वनाझ-रामवाडी या दोन्ही मार्गिकांवरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना जिल्हा न्यायालय इंटरचेंज स्थानकावर मार्गिका बदलण्याची सुविधा उपलब्ध असेल. पुणे मेट्रो प्रशासनाने सर्व धावपटू, नागरिक आणि क्रीडाप्रेमींना या विशेष मेट्रो सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. सुरक्षित, जलद आणि विनाअडथळा प्रवासासाठी मेट्रोचा वापर करून वाहतूक कोंडी कमी करण्यास सहकार्य करावे, असेही प्रशासनाने म्हटले आहे.

दिघी परिसरात देशी बनावटीचे पिस्तूल आणि काडतूस बाळगणाऱ्या तरुणाला अटक

■ पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत शस्त्र बाळगण्यास मनाई आदेश लागू असतानाही विनापरवाना देशी बनावटीचे पिस्तूल आणि एक जिवंत काडतूस जवळ बाळगणाऱ्या २१ वर्षीय तरुणाला दिघी पोलिसांनी पकडले आहे. आरोपीकडून सुमारे ५१ हजार रुपये किमतीचे पिस्तूल आणि काडतूस जप्त करण्यात आले आहे. कृष्णा सतीश घाडगे (वय २१, रा. नारायण नगर, खंडोबा माळ, फुरसुंगी, ता. हवेली, जि. पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत ११ नोव्हेंबर ते २४ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत दगड, शस्त्रे, तलवारी, भाले, लाठ्या, बंदुका तसेच शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येणाऱ्या वस्तू जवळ बाळगण्यास मनाई आदेश जारी करण्यात आला आहे.

मात्र, १२ नोव्हेंबर रोजी रात्री ९ वाजून २५ मिनिटांच्या सुमारास दिघी येथील मॅगझीन चौकातून वाळके मळ्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर आरोपी कृष्णा घाडगे हा या आदेशाचे उल्लंघन करून देशी बनावटीचे एक पिस्तूल आणि एक काडतूस विनापरवाना बेकायदेशीररीत्या जवळ बाळगताना आढळून आला. याप्रकरणी दिघी पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल सुधीर हरिश्चंद्र डोळस यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक वरे करीत आहेत.

आयएमएफ वेस्ट झोन स्पोर्ट क्लायम्बिंग चॅम्पियनशिप २०२६ स्पर्धेचे उद्घाटन

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पिंपळे सौदागर येथील योगा उद्यानातील क्लायम्बिंग वॉलवर आयोजित करण्यात आलेल्या ३० व्या आयएमएफ वेस्ट झोन स्पोर्ट क्लायम्बिंग चॅम्पियनशिप २०२६ या स्पर्धेचे उद्घाटन आज उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या उद्घाटनप्रसंगी नगरसदस्य शत्रुघ्न बाप्पू काटे, नाना काटे, अनिता काटे, कुंदा भिसे तसेच देवांग नाईक, के. सरस्वती, श्रीकृष्ण कडुस्कर यांच्यासह देशाच्या विविध भागांतून सहभागी झालेले खेळाडू, त्यांचे मार्गदर्शक, क्रीडाप्रेमी प्रेक्षक आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते.

महाराष्ट्र क्लायम्बिंग असोसिएशन आणि इंडियन माउंटेनियरिंग फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१३ ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. देशाच्या विविध भागांतील खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले असून, त्यांना आपल्या कौशल्याचे आणि क्रीडा नैपुण्याचे प्रदर्शन करण्याची संधी मिळत आहे.

पिंपरी चिंचवड शहरात राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेचे आयोजन होणे ही शहरासाठी अभिमानाची बाब आहे. अशा स्पर्धांमुळे शहराची राष्ट्रीय स्तरावर ओळख निर्माण होण्यास मदत होते, तसेच स्थानिक खेळाडूंनाही प्रोत्साहन मिळते. पिंपळे सौदागर येथील जागतिक दर्जाच्या क्लायम्बिंग वॉलमुळे भविष्यात या ठिकाणी आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचे आयोजन करण्यासाठीही निश्चितच पोषक वातावरण निर्माण होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. पिंपरी चिंचवड शहरातील क्रीडा संस्कृतीला चालना देणे, उदयोन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन देणे आणि त्यांना दर्जेदार क्रीडा सुविधा उपलब्ध करून देणे यासाठी महापालिकेच्या वतीने सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत.

गिनीज विश्वविक्रमाची नोंद करणारी 'इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन' २९ नोव्हेंबरला मोशीत!

■ पिंपरी (दै. संध्या)



सायकलींची सर्वांत लांब रांग उभारून २०२३ मध्ये गिनीज विश्वविक्रम नोंदविणाऱ्या 'इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन'चे यंदाचे आयोजन रविवार, दि. २९ नोव्हेंबर २०२६ रोजी मोशी येथे करण्यात आले आहे. आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या उपक्रमाची यंदाची रॅली सकाळी ६ वाजता हिंदुभूषण छत्रपती संभाजी महाराज स्मारकाजवळील पीआयईसीसी मैदानावरून (PIECC Ground) सुरू होणार आहे. सहभाग मोफत असून नोंदणीला सुरुवात झाली आहे.


इंद्रायणी नदीची स्वच्छता आणि संवर्धनाचा संदेश देण्यासाठी सुरू झालेल्या या उपक्रमाला यापूर्वीही मोठा प्रतिसाद मिळाला आहे. २०२३ मध्ये सायक्लोथॉनच्या टीमने जर्मनीचा तत्कालीन विक्रम मोडून 'Longest Line of Bicycles (Static)' या प्रकारात गिनीज विश्वविक्रम नोंदवला. त्या वर्षीच्या सायकल रॅलीत ३० हजारांहून अधिक सायकलस्वार सहभागी झाले होते. Pune

तसेच, २३ नोव्हेंबर २०२५ रोजी मोशी येथे झालेल्या सायक्लोथॉनमध्ये ५१ हजार ३०० हून अधिक सायकलस्वार सहभागी झाले होते, तर कार्यक्रमाला सुमारे ७९ हजार नागरिकांची एकूण उपस्थिती होती. यावर्षी आतापर्यंतचे रेकॉर्ड मोडीत काढण्याचा संकल्प आयोजकांनी केला आहे.

सहभागींना आपल्या क्षमतेनुसार ५ किंवा २५ किलोमीटर अंतर निवडता येईल. प्रत्येक सहभागीला टी-शर्ट, सहभागाचे पदक आणि अल्पोपाहार देण्यात येणार आहे. इच्छुकांनी अधिकृत पोस्टरवरील QR कोड स्कॅन करून मोफत नोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या उपक्रमाच्या आयोजनात आणि सहकार्यात अविरत श्रमदान, सायकल मित्र, महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांचा सहभाग आहे. अधिक माहितीसाठी 99226 85487 या क्रमांकावर संपर्क करावा.

अनधिकृत बाईक टॅक्सीविरोधात रिक्षा, टॅक्सी चालकांचा एल्गार

■ आळंदी (दै. संध्या)






अनधिकृत बाईक टॅक्सींचा वाढता सुळसुळाट, ऑनलाइन ॲप आधारित कंपन्यांची मनमानी आणि ऑटोरिक्षा, टॅक्सी व कॅब चालक-मालकांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्रातील चालक संघटना एकवटणार आहेत. यासाठी रविवार, दि. १५ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता आळंदी देवाची येथे राज्यव्यापी संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली आहे. ऑटो टॅक्सी ट्रान्सपोर्ट फेडरेशन ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र रिक्षा पंचायतचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बाबा कांबळे यांनी ही माहिती दिली.

आळंदी येथील समस्त हराळे वैष्णव समाज धर्मशाळा, संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरासमोर ही बैठक होणार आहे. राज्यातील विविध ऑटोरिक्षा, टॅक्सी आणि कॅब चालक-मालक संघटनांचे पदाधिकारी, प्रतिनिधी, कायदेशीर सल्लागार आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. महाराष्ट्रात विनापरवाना बाईक टॅक्सींचे प्रमाण वाढत असून, त्यामुळे परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांच्या व्यवसायावर परिणाम होत असल्याचा संघटनांचा आरोप आहे. तसेच ऑनलाइन ॲप आधारित कंपन्यांकडून मनमानी भाडे धोरण राबविले जात असल्याने चालकांची आर्थिक पिळवणूक होत आहे. दुसरीकडे, शासनाने घोषित केलेले ऑटोरिक्षा, टॅक्सी व कॅब चालक-मालक कल्याणकारी महामंडळ अद्याप प्रत्यक्षात कार्यान्वित झालेले नाही. या सर्व प्रश्नांवर एकत्रित लढा उभारण्याची भूमिका संघटनांनी घेतली आहे. या बैठकीत अनधिकृत बाईक टॅक्सीवर बंदी घालून संबंधित कंपन्यांवर कठोर कारवाई करणे, ऑनलाइन ॲप कंपन्यांच्या भाडे धोरणावर नियंत्रण आणणे आणि चालक-मालक कल्याणकारी महामंडळाची तातडीने स्थापना करून त्यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करणे, या प्रमुख मागण्यांवर चर्चा होणार आहे. याशिवाय परवाना नूतनीकरण, वाहनांच्या फिटनेस तपासणी प्रक्रियेतील कथित भ्रष्टाचार, सुरक्षित पार्किंग स्टँडची उपलब्धता आणि चालकांना कामगार कायद्यांतर्गत मिळणारे हक्क या विषयांवरही विचारविनिमय केला जाणार आहे. शासनाला सर्वसमावेशक कायदेशीर निवेदन देण्याबरोबरच राज्यव्यापी महामोर्चा, धरणे आंदोलन आणि प्रशासकीय असहकार यांसारख्या आंदोलनांची दिशा निश्चित केली जाणार आहे. डॉ. बाबा कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या बैठकीस पुणे, पिंपरी-चिंचवड, मुंबई, ठाणे, नागपूर, नाशिक, सांगली, सातारा, कोल्हापूर यांसह राज्यातील विविध जिल्ह्यांतील संघटनांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. 'अन्यायाविरुद्ध एकत्र येऊन आपल्या हक्कांचे आणि व्यवसायाच्या अस्तित्वाचे रक्षण करण्यासाठी सर्व रिक्षा, टॅक्सी व कॅब चालक-मालकांनी या बैठकीला उपस्थित राहावे. एकजुटीतूनच आपल्या मागण्यांना न्याय मिळवून देता येईल,' असे आवाहन डॉ. बाबा कांबळे यांनी केले आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



लोणी काळभोर येथे गणपती बाप्पाच्या मूर्तीची भक्तिमय वातावरणात स्थापना

लोणी काळभोर : दैनिक संध्या

लोणी काळभोर (ता. हवेली) येथे लोणी काळभोर येथील जुने अंबरनाथ मंदिराच्या शेजारी श्री नाथ गणपती मंदिर प्रतिष्ठापना सोहळा संपन्न झाला .यावेळी श्रींची भव्य मिरवणुकीचे काढण्यात आली .सर्व भाविकांसाठी ही आनंदाची पर्वणी होती .श्री नाथ गणपती बाप्पांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना होताना भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते अशी माहिती राजा शिव छत्रपती व्यायाम मंडळाचे अध्यक्ष सचिन थेऊरकर यांनी दिली . व राजा शिव छत्रपती व्यायाम मंडळ व स्व . प्रमोदभाऊ ताकवले विचार मंचाने याचे आयोजन केले होते . भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात स्थापना करण्यात आली. गणपती बाप्पाच्या प्रतिष्ठापनेच्या आगमनामुळे परिसरात सर्वत्र आनंदाचे आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले आहे. गणेशभक्तांनी मोठ्या श्रद्धेने आणि भक्तिभावाने बाप्पाचे स्वागत केले.गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया, असा जयघोष करत गणेशमूर्तीची विधिवत पूजा-अर्चा करून प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी पारंपरिक धार्मिक विधी, मंत्रोच्चार आणि आरतीने परिसर भक्तिमय झाला होता. गणेशमूर्तीच्या आगमनानिमित्त आकर्षक सजावट, फुलांची आरास आणि विद्युत रोषणाई करण्यात आली होती. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी या सोहळ्यात उत्साहाने सहभाग घेतला. यानिमित्ताने सामाजिक एकोपा, बंधुभाव आणि धार्मिक परंपरा जपण्याचा संदेश देण्यात आला आहे. यावेळी उपाध्यक्ष गणेश नगिणे ,खजिनदार रूपेश पवार ,छत्रसाल ताकवले , अमरजित कदम ,अनिकेत जावळकर ,किशोर शिवले , राहुलसिंग बडगुजर ,श्लोक गडकर अनेक भाविक उपस्थित होते .



कलाविष्कार दिवाळी अंकाचे प्रकाशन

चाकण : दैनिक संध्या

दिवाळी पाडवा व भाऊंची आठवण या विशेष कार्यक्रमाच्या निमित्ताने कलाविष्कार मंच चाकण यांच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या कलाविष्कार दिवाळी अंकाचे प्रकाशन उत्साहात संपन्न झाले. या प्रकाशन सोहळ्यास चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनीषाताई सुरेशभाऊ गोरे, उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी, नगरसेविका सुवर्णा राक्षे, नगरसेवक मंगेश कांडगे, एड. प्रकाश गोरे, उद्योजक राजेंद्र गोरे, बिपिन रासकर, शशिकांत जाधव, स्मिता जाधव, प्रमिला गोरे, राजूशेठ जवळेकर, विकास गोरे, सचिन वाघमारे, महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितीनभाऊ गोरे, जिल्हा परिषद सदस्य विजयसिंह शिंदे, पर्यावरण प्रेमी मनोहर शेवकरी, उद्योजक विशाल बारवकर, आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते नारायण करपे, राजगुरुनगर सहकारी बँकेचे संचालक महेश शेवकरी, रूपाली कांडगे, तसेच महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून आलेले कवी, लेखक चाकणमधील साहित्यप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. साहित्य, कला आणि संस्कृतीचा संगम घडविणाऱ्या या दिवाळी अंकाच्या माध्यमातून विविध साहित्यिकांच्या लेखणीला व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी, गटनेते नितीन गोरे व नगरसेवक मंगेश कांडगे आदींनी या दिवाळी अंकाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नारायण करपे यांनी केले. प्रास्ताविक मनोहर बापू शेवकरी यांनी केले. आभार विशाल बारवकर यांनी मानले.

तयाजी नाना चौधरी यांचे निधन

कोरेगावमुळ: दैनिक संध्या



सोरतापवाडी येथील ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व तयाजी नाना कोंडीबा चौधरी यांचे वयाच्या ७७ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने गावावर शोककळा पसरली आहे. हरिनाम सप्ताह कमिटीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी सहकार, सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. साधा स्वभाव, प्रेमळ वागणूक आणि समाजकार्याची आवड यामुळे ते ग्रामस्थांच्या मनात विशेष स्थान निर्माण करुन होते. ते माजी उपसरपंच भाऊसाहेब चौधरी व अमोल चौधरी यांचे वडील होत. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने गावाने ज्येष्ठ मार्गदर्शक गमावला आहे.

सिताबाई थिटे कॉलेजमध्ये राज्यस्तरीय 'फार्मा आयडियाथॉन २०२६' उत्साहात संपन्न!

कवठे येमाई : दैनिक संध्या



सिताबाई थिटे कॉलेज ऑफ फार्मसी, शिरूर येथे २ नोव्हेंबर रोजी इंडियन फार्मास्युटिकल असोसिएशन, आळेफाटा लोकल ब्रँच आणि नॅशनल फार्मसी वेल्फेअर असोसिएशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय 'फार्मा आयडियाथॉन २०२६' स्पर्धा उत्साहात पार पडली. या स्पर्धेत राज्यातील ३९ फार्मसी महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेत नावीन्यपूर्ण फार्मा मॉडेल्स सादर केली. कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र थिटे, सचिन कोतवाल, बाबाजी गलांडे, डॉ. अमोल शहा आणि डॉ. सचिन कोठवदे यांच्या उपस्थितीत झाले. विद्यार्थ्यांनी स्मार्ट ड्रग डिलिव्हरी, नियंत्रित औषधमुक्तता आणि जैवतंत्रज्ञान यांसारख्या विषयांवर आधारित संशोधनपर मॉडेल्स सादर करत उपस्थितांची मने जिंकली. बी.फार्मसी व एम.फार्मसी विभागात समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी,बेल्हे येथील अश्विनी भोर व प्रतिभा गावडे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. तर डी. फार्मसी विभागात के बीएचएस ट्रस्ट इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथील पीयूष निकम व पंकज कापसे यांनी प्रथम क्रमांक मिळवला. विजेत्यांना रोख पारितोषिके,प्रमाणपत्रे व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमधील संशोधनवृत्ती, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि नावीन्यपूर्ण कल्पनांना प्रोत्साहन मिळाले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक, आयोजन समिती व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. सहभागी विद्यार्थ्यांचे मान्यवरांनी अभिनंदन केले.



भोसे येथे खोखो क्रीडांगणावर रंगला दीपप्रज्वलन सोहळा

■ चाकण (दै. संध्या)

खेड तालुक्यातील भोसे येथे गजपार्वतेश्वर क्रीडा मंडळाच्या वतीने खोखो क्रीडांगणावर दीपप्रज्वलन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

ग्रामीण भागातील क्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन मिळावे, खेळाडूंमध्ये नवचैतन्य निर्माण व्हावे आणि क्रीडा क्षेत्रात नव्या उमेदीने वाटचाल सुरू व्हावी, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दीपप्रज्वलनाच्या माध्यमातून क्रीडा क्षेत्रातील उज्ज्वल भविष्य, जिद्द, चिकाटी, शिस्त आणि खिलाडू वृत्तीचा संदेश देण्यात आला. खेळ हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून व्यक्तिमत्त्व विकासाचे आणि सामाजिक एकतेचे प्रभावी माध्यम आहे, हा विचार या उपक्रमातून अधोरेखित झाला आहे. यावेळी नागेश मुंगसे व योगेश कुटे यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करत क्रीडा वाटचालीसाठी प्रोत्साहन दिले. खेळाडूंनी नियमित सराव, जिद्द, चिकाटी आणि शिस्त यांच्या जोरावर क्रीडा क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले. तसेच खेळांमध्ये विजयाबरोबरच खिलाडूवृत्ती, संघभावना आणि एकमेकांप्रती आदर असणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाला भोसे ग्रामस्थ, खेळाडू व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आजच्या धकाधकीच्या काळात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. खेळामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच आत्मविश्वास, नेतृत्वगुण, निर्णयक्षमता आणि सांघिक भावना विकसित होते. ग्रामीण भागातील खेळाडूंना योग्य मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळाल्यास ते तालुका, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरही आपली गुणवत्ता सिद्ध करू शकतात. गजपार्वतेश्वर क्रीडा मंडळाच्या या स्तुत्य उपक्रमामुळे खोखो क्रीडांगणावर उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी मंडळाच्या वतीने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

नगरपालिकेचा ३९ गुंठ्यांचा भूखंड चोरीला गेल्याचा आरोप; बहुजन हक्क परिषदेचे हलगीनाद आंदोलन!

■ पुरंदर (दै. संध्या)

जेजुरी शहराच्या मध्यवस्तीत आणि बसस्थानकाला लागून असलेला नगरपरिषदेच्या मालकीचा गट क्रमांक ४४७ (जुना गट क्रमांक १०९२), क्षेत्रफळ ३९ गुंठे हा भूखंड गायब झाल्याचा गंभीर आरोप करत शुक्रवारी (दि. १३) बहुजन हक्क परिषदेच्या वतीने जेजुरी नगरपरिषद कार्यालयासमोर पोतराजासह हलगीनाद आंदोलन करण्यात आले. या आंदोलनातून नगरपरिषद प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, जेजुरी बसस्थानकालगत गट क्रमांक ४४८ (जुना गट क्रमांक १०९३, सिटी सर्व्हे क्रमांक १५११), क्षेत्रफळ १२१ गुंठे हा खासगी मालकीचा भूखंड असून, त्यालगतच नगरपरिषदेच्या मालकीचा गट क्रमांक ४४७ हा ३९ गुंठ्यांचा भूखंड आहे. मागील काही वर्षांत खासगी मालकीच्या जागांची गुंठेवारीने खरेदी-विक्री होऊन त्या ठिकाणी व्यावसायिक इमारती उभारण्यात आल्या आहेत. मात्र, खासगी जागेची खरेदी करून उभारण्यात आलेल्या काही व्यावसायिक इमारती नगरपरिषदेच्या मालकीच्या भूखंडात येत असल्याचा आरोप बहुजन हक्क परिषदेचे शहराध्यक्ष यशवंत दोडके यांनी केला आहे. या गंभीर प्रकाराकडे नगरपरिषद प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा दावाही त्यांनी केला.

दरम्यान, पंधरा दिवसांपूर्वी या भूखंडालगतच्या खासगी मालकीच्या सहा गुंठे जागेची कोट्यवधी रुपयांना विक्री झाल्याने शहरात या जागेच्या मालकीवरून चर्चेला उधाण आले आहे.नगरपरिषदेच्या गट क्रमांक ४४७ या भूखंडाची शासकीय मोजणी करून हद्द निश्चित करावी, जागेवर नगरपरिषदेच्या मालकीचा फलक लावावा, तसेच नगरपरिषदेच्या ठरावानुसार जागा मिळालेल्या व्यक्तींव्यतिरिक्त खासगी जागा खरेदी करून नगरपरिषदेच्या भूखंडात व्यावसायिक इमारती उभारणाऱ्यांवर आणि संबंधित जागांची विक्री करणाऱ्या खासगी मालकांवर कायदेशीर कारवाई करावी, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. तसेच, नगरपरिषदेच्या भूखंडाची मोजणी होऊन हद्द निश्चित होईपर्यंत लगतच्या खासगी भूखंडांची खरेदी-विक्री थांबवावी आणि संबंधित नोंदणी प्रक्रिया स्थगित ठेवावी, अशी मागणी करणारे निवेदन यशवंत दोडके यांनी पंधरा दिवसांपूर्वी नगरपरिषद प्रशासनाला दिले होते. या निवेदनाच्या अनुषंगाने प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी पोतराजासह हलगीनाद आंदोलन करण्यात आले. या आंदोलनावेळी माजी विश्वस्त शिवराज झगडे, शिवसेनेचे शहराध्यक्ष किरण दावलकर, पत्रकार प्रकाश फाळके, बदाम माकर, जाफर सय्यद, शांताराम खोमणे, प्रथमेश सकट, निरंजन पवार, सुमित बारभाई, अथर्व साळवे, हेमंत माने, सुशांत दोडके, अभिजित दोडके, अक्षय दोडके, कैलास भोर, ऋषिकेश इंगळे, बालाजी काळे, अमोल पवार यांच्यासह बहुजन हक्क परिषदेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अधिकाऱ्यांच्या चौकशीची मागणी!

जेजुरी येथील भूमी अभिलेख कार्यालयाच्या शाखेत कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या कामकाजाची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी शिवसेनेचे शहराध्यक्ष किरण दावलकर यांच्यासह ग्रामस्थांनी केली आहे. गेल्या दोन वर्षांत जमिनीच्या कागदपत्रांमध्ये फेरबदल करण्यात आल्याचा गंभीर आरोपही यावेळी करण्यात आला. जमीन विक्री करणाऱ्या संबंधित खासगी मालकांवरदेखील कारवाई करावी, यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याचे यशवंत दोडके यांनी सांगितले. आंदोलनाचे प्रास्ताविक शिवराज झगडे यांनी केले, तर आभार बदाम माकर यांनी मानले.



आंदोलनकर्त्यांना लेखी आश्वासन

आंदोलनाची दखल घेत नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने अधिकारी सुनील ताजवे आणि बाळासाहेब खोमणे यांनी आंदोलनकर्त्यांना लेखी आश्वासन दिले. गट क्रमांक ४४७ या भूखंडाची रीतसर शासकीय मोजणी करण्यासाठी भूमी अभिलेख कार्यालयाकडे अर्ज देण्यात आला असून, प्रत्यक्ष मोजणी करून हद्द निश्चित करण्यात येईल. त्यानंतर नगरपरिषदेच्या मालकीच्या भूखंडात व्यावसायिक इमारती आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

जेजुरी शासकीय तंत्रनिकेतनच्या नामांतरावरून वादाची ठिणगी!

■ पुरंदर (दै. संध्या)

जेजुरी येथील शासकीय तंत्रनिकेतन विद्यालयाच्या नामांतरावरून आता नवा वाद निर्माण होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. या संस्थेला 'दत्तोपंत मसकर शासकीय तंत्रनिकेतन' असे नाव देण्याचे शासनाच्या वतीने जाहीर करण्यात आल्याचे वृत्त मंगळवारी (दि. १०) एका वर्तमानपत्रात प्रसिद्ध होताच जेजुरीसह पुरंदर तालुक्यातील नागरिकांमधून तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. शासनाने जाहीर केलेल्या नामकरणाला स्थानिक ग्रामस्थांनी विरोध दर्शविला असून, पुरंदरच्या ऐतिहासिक वारशातील एखाद्या महापुरुषाचे नाव या संस्थेला देण्यात यावे, अशी मागणी पुढे आली आहे.

पुरंदर तालुका हा छत्रपती शिवरायांच्या स्वराज्याच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण भूमी आहे. स्वराज्याच्या लढाया, शौर्य, बलिदान, संतपरंपरा आणि सामाजिक सुधारणांचा समृद्ध वारसा या भूमीला लाभला आहे. महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या श्री खंडोबाचे अधिष्ठान असलेल्या जेजुरी नगरीलाही ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. असे असताना शासनाला पुरंदरच्या इतिहासातील महापुरुषांची नावे आठवली नाहीत काय, असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

जेजुरी येथील शासकीय तंत्रनिकेतन संस्था गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत असून, या संस्थेत परिसरातील सर्वसामान्य शेतकरी, कष्टकरी, गोरगरीब आणि श्रमिक कुटुंबांतील विद्यार्थी तांत्रिक शिक्षण घेत आहेत. त्यामुळे या संस्थेचे नामकरण करताना स्थानिक जनभावना, ऐतिहासिक वारसा आणि लोकप्रतिनिधींचे मत विचारात घेणे आवश्यक असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

शासनाने जाहीर केलेल्या दत्तोपंत मसकर या नावाला ग्रामस्थांचा विरोध असून, पुरंदरमधील लोकप्रतिनिधींशी चर्चा करून नामकरणाचा निर्णय पुन्हा विचारात घ्यावा, अशी मागणी दादा फाउंडेशनच्या वतीने करण्यात येणार आहे. यासंदर्भात आमदार विजय शिवतारे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उच्च व तंत्रशिक्षणमंत्री यांना निवेदन देण्यात येणार आहे. शासनाने लोकभावनेचा विचार करून नामकरणात बदल केला नाही, तर दादा फाउंडेशनच्या वतीने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

पुरंदरच्या इतिहासात अनेक महापुरुषांचे योगदान!

पुरंदरच्या भूमीला शौर्य, पराक्रम आणि बलिदानाचा मोठा इतिहास लाभला आहे इंग्रजांविरुद्ध पहिले बंड पुकारणारे आद्य क्रांतिकारनरवीर उमाजी नाईक . स्वराज्याच्या पहिल्या लढाईत बलिदान देणारे सरदार गोदाजीराजे जगताप, शिवाजीराव इंगळे, स्वराज्याचे पहिले सेनापती वीर बाजी पासलकर, पुरंदरच्या लढाईत पराक्रमाची शर्थ करून बलिदान देणारे मुरारबाजी देशपांडे, तसेच मुघल सरदार मिर्झाराजे जयसिंह आणि दिलेरखान यांच्या ऐतिहासिक मोहिमांचा पुरंदरच्या इतिहासाशी संबंध आहे.

स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजीराजे यांची जन्मभूमी असलेला पुरंदर, स्वराज्याच्या पहिल्या महाराणी सईबाईसाहेब यांचे पुरंदर किल्ल्यावरील वास्तव्य, ब्रिटिश राजवटीविरोधात बंड पुकारणारे आद्य क्रांतिवीर उमाजीराजे नाईक आणि हरी मकाजी नाईक यांचे योगदानही या भूमीच्या इतिहासात महत्त्वाचे आहे. जेजुरीच्या विकासात योगदान देणारे मल्हारराव होळकर घराणे, पेशवेकालीन शाहीर सगनभाऊ जेजुरीकर, सत्यशोधक चळवळीचे जनक महात्मा ज्योतिराव फुले, तसेच जेजुरी येथे झालेली शहाजीराजे आणि छत्रपती शिवाजीराजे यांची ऐतिहासिक भेट अशा अनेक घटनांनी पुरंदरचा इतिहास समृद्ध झाला आहे.तर अलीकडच्या काळातील नामांकित कै लावणीसम्राज्ञानि रोशन सातारकर, या ऐतिहासिकआणि सांस्कृतिक वारशाचा विचार करून शासनाने जेजुरीच्या शासकीय तंत्रनिकेतन संस्थेला यापैकी एखाद्या इतिहासपुरुषाचे नाव द्यावे, अशी मागणी दादा फाऊंडेशनच्या वतीने पुढे आणण्यात येणार आहे.

एकाच कुटुंबातील तिघांना मारहाण

■ कवठे येमाई (दै. संध्या)

ग्रामपंचायतीतील सदस्यपदाच्या अडीच वर्षांच्या कार्यकाळावरून निर्माण झालेल्या वादाचे पर्यवसान मारहाणीत झाले. शिरूर ग्रामीण येथील पाषाण मळा परिसरात एकाच कुटुंबातील तिघांना लोखंडी रॉड व कोयत्याने मारहाण करून जखमी केल्याची घटना घडली. याप्रकरणी सचिन भाऊसाहेब घावटे,प्रथमेश धनंजय घावटे व ऋषिकेश शेलार या तिघांविरुद्ध शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदाचा व सदस्यपदाचा अडीच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर ठरल्याप्रमाणे सदस्यपद देण्याच्या कारणावरून वाद निर्माण झाला होता. याच वादातून आरोपींनी फिर्यादीच्या घरात प्रवेश करून त्यांच्या पतीला घराबाहेर ओढत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. याप्रकरणी सौ. सीमा सोमनाथ घावटे (वय ४०, रा. पाषाण मळा, शिरूर) यांच्या फिर्यादीवरून शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

डॉ. प्रियांका गोरे यांना जपानच्या कोबे विद्यापीठाची पीएचडी

■ चाकण (दै. संध्या)

चाकण येथील डॉ. प्रियांका सुरेश गोरे यांनी जपानमधील नामांकित कोबे विद्यापीठातून मज्जासंस्थाविज्ञान (न्यूरोसायन्स) विषयात पीएचडी पदवी संपादन केली आहे. त्यांच्या या यशाबद्दल चाकण पंचक्रोशीतून त्यांच्यावर कौतुकांचा वर्षाव होत आहे.

डॉ. प्रियांका गोरे यांचे पहिली ते दहावीपर्यंतचे शिक्षण चाकण येथील जनता शिक्षण संस्थेच्या श्री शिवाजी विद्यामंदिर प्रशालेत झाले. अकरावी व बारावीचे शिक्षण त्यांनी नवी सांगवी येथील बा. रा. घोलप महाविद्यालयात पूर्ण केले. त्यानंतर पुण्यातील गणेशखिंड येथील मॉडर्न महाविद्यालयातून विज्ञान शाखेतील पदवी आणि जीवशास्त्र विषयातील पदव्युत्तर (एम.एस्सी.) पदवी प्राप्त केली.

शिक्षणानंतर त्यांनी पुणे जिल्ह्यातील जुन्नर येथील शिवछत्रपती महाविद्यालय तसेच पुण्यातील आप्पासाहेब जेधे महाविद्यालयात काही काळ सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्य केले.

नोकरी आणि संशोधन यांचा समतोल साधत त्यांनी जपानमधील ह्योगो प्रांतातील कोबे विद्यापीठात न्यूरोसायन्स मधील न्यूरो-ऑप्टोफिजिओलॉजी या अत्याधुनिक विषयात तीन वर्षे अथक परिश्रम घेऊन संशोधन पूर्ण केले आणि पीएचडी पदवी संपादन केली आहे. या संशोधनासाठी त्यांना प्रा. मित्सुहिरो मोरिता यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच जपान विज्ञान व तंत्रज्ञान संस्थेच्या (जेएसटी) प्रतिष्ठित 'स्प्रिंग' शिष्यवृत्तीचे आर्थिक पाठबळ मिळाले. सध्या त्या याच क्षेत्रात संशोधक म्हणून पुढील संशोधन कार्य करत आहेत. डॉ. प्रियांका गोरे म्हणाल्या, "आई उर्मिला, वडील सुरेश, भाऊ प्रतीक आणि बहीण प्रज्ञा यांनी उच्च शिक्षणासाठी वेळोवेळी मला प्रोत्साहन दिले. त्यांच्या पाठिंब्यामुळे आणि माझ्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे मला हे यश संपादन करता आले."डॉ. गोरे यांच्या या यशाबद्दल चाकण परिसरातील विविध सेवाभावी संस्था व संघटनांच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला. प्रयत्न, जिद्द, चिकाटी आणि प्रचंड आत्मविश्वासाच्या जोरावर मी हे यश मिळवले आहे. नियमित अभ्यास, वेळेचे योग्य नियोजन आणि आव्हाने स्वीकारण्याची तयारी असेल, तर यश निश्चित मिळते, असे डॉ. गोरे यांनी नमूद केले.



थोडक्यात पण महत्वाचे



पुण्यात 'रेफकोल्ड इंडिया 2026'- आंतरराष्ट्रीय प्रदर्शन व परिषद

पुणे : दैनिक संध्या

इंडियन सोसायटी ऑफ हीटिंग,रेफ्रिजरेटिंग अँड एअर कंडिशनिंग इंजिनिअर्स(ISHRAE)तर्फे रेफकोल्ड इंडिया २०२६ या दक्षिण आशियातील भव्य आंतरराष्ट्रीय रेफ्रिजरेशन आणि कोल्ड चेन या प्रदर्शन व परिषद याचे आयोजन करण्यात आले आहे हे प्रदर्शन १९ ते २१ नोव्हेंबर २०२६ दरम्यान ॲग्रिकल्चर कॉलेज ग्राउंड,पुणे येथे भरणार आहे.या प्रदर्शन व परिषदेचे उद्घाटन गुरुवार दिनांक १९ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी साडे नऊ वाजता महाराष्ट्र शासनाचे विपणन व शिष्टाचार मंत्री माननीय श्री जयकुमार रावल यांच्या हस्ते होणार आहे.विभागीय आयुक्त पुणे विभाग श्रीमती शीतल उगले-तेली (आयएएस),अधिष्ठाता (डीन) कृषी महाविद्यालय पुणे चे श्री सुभाष भालेकर आणि इशरेचे सोसायटी अध्यक्ष डॉ .सरवानन हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित रहाणार आहेत. रेफ्रिजरेशन आणि कोल्ड चेन क्षेत्रातील 'कुंभमेळा'म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या तीन दिवसीय प्रदर्शन व परिषदेत भारतासह परदेशातील हजारो उद्योग व्यावसायिक,उत्पादक,तंत्रज्ञान पुरवठादार, कंत्राटदार,धोरणकर्ते,शासकीय प्रतिनिधी,निर्णयकर्ते आणि शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञ सहभागी होणार आहेत.२ 00 हून अधिक स्टॉल्समध्ये स्मार्ट,शाश्वत आणि भविष्यासाठी सज्ज तंत्रज्ञानाचे प्रदर्शन; देश-विदेशातील उद्योग तज्ज्ञ,धोरणकर्ते आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील मान्यवरांचा सहभाग असेल. पुण्याची ओळख "भारतातील रेफ्रिजरेशनची राजधानी" म्हणून निर्माण झाली असून,शहरात रेफ्रिजरेशन क्षेत्रातील व्यावसायिक,उत्पादक,अभियंते, तंत्रज्ञ आणि तज्ज्ञांचे मजबूत नेटवर्क आहे. इशारे पुणे चाप्टर ने या क्षेत्रातील तांत्रिक ज्ञान आणि व्यावसायिक कौशल्य वृद्धिंगत करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.रेफ्रिजरेशन हँडबुक्स,कोल्ड स्टोरेज बेसिक्स व डिझाइन गाइड्स,तांत्रिक लेख,सादरीकरणे तसेच रेफकॉन आणि ग्रीन कॉनक्लेवस या सारख्या विविध उपक्रमांद्वारे ज्ञानाची देवाणघेवाण आणि उद्योगाच्या विकासाला चालना देण्यात आली आहे.

महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स' चित्रपटाचे शीर्षक तातडीने बदला; आम आदमी पार्टीची आक्रमक मागणी



पुणे : दैनिक संध्या

आगामी 'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स' या चित्रपटाच्या शीर्षकातून 'महाराष्ट्र' हे नाव तातडीने वगळण्यात यावे, अशी आक्रमक मागणी आम आदमी पार्टी युवा आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात आम आदमी पार्टी युवा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष रविराज काळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि चित्रपट महामंडळ यांच्याकडे ईमेलवर पाठवून तीव्र निषेध नोंदवला आहे. ईमेल म्हटले आहे की, सध्या 'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स' नावाच्या चित्रपटाची निर्मिती सुरू असल्याची माहिती समोर येत आहे. या चित्रपटाच्या नावावर राज्यातील सर्वसामान्य जनतेच्या वतीने आम आदमी पार्टी तीव्र आक्षेप नोंदवत आहे. शिवराय, फुले, शाहू आणि आंबेडकरांच्या या पुरोगामी महाराष्ट्रात अशा प्रकारची भोंदू विकृती निर्माण होणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. अशा गुन्हेगारी घटना पुन्हा घडू नयेत आणि समाजात जनजागृती व्हावी या हेतूने जर चित्रपट बनवला जात असेल, तर आम आदमी पार्टी त्याचे नक्कीच स्वागत करते. मात्र, एका विकृत आणि गुन्हेगारी प्रकरणाच्या नावामागे 'महाराष्ट्र' हा शब्द जोडणे हा संपूर्ण महाराष्ट्राच्या अस्मितेचा आणि कोट्यवधी मराठी माणसांच्या स्वाभिमानाचा घोर अपमान आहे. महाराष्ट्र ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची, छत्रपती संभाजी महाराजांच्या अतुलनीय शौर्याची, राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक न्यायाची, महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या समतेच्या विचारांची आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानिक लोकशाहीचा गौरवशाली वारसा लाभलेली भूमी आहे. संतांच्या, शूरवीरांच्या आणि समाजसुधारकांच्या या भूमीने जगाला समता, न्याय, बंधुता आणि मानवतेचा संदेश दिला आहे. 'जय जय महाराष्ट्र माझा' असे अभिमानाने म्हणणाऱ्या कोट्यवधी जनतेसाठी 'महाराष्ट्र' हे नाव स्वाभिमान आणि परिवर्तनवादी विचारांचे प्रतीक आहे. अशा परिस्थितीत एखाद्या किळसवाण्या व लैंगिक शोषणाच्या विकृत प्रकरणाशी संबंधित चित्रपटाला 'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स' असे नाव देणे अत्यंत अयोग्य आणि संतापजनक आहे.

मराठी चित्रपटसृष्टीत थराराची नवी एन्ट्री; 'मिरांडा वॉर्निंग'चा ट्रेलर प्रदर्शित!



पुणे : दैनिक संध्या

चित्रपट पाहताना प्रत्येक दृश्यात पुढे काय घडणार, कोण खरं बोलतंय आणि कोण खोटं, गुन्हेगार नेमका कोण, या प्रश्नांची उत्तरे शोधण्यात प्रेक्षकांना जी मजा मिळते, तोच अनुभव देण्यासाठी आता मराठी चित्रपटसृष्टीत 'मिरांडा वॉर्निंग' हा नवा सस्पेन्स क्राईम थ्रिलर दाखल होत आहे. या चित्रपटाचा बहुप्रतीक्षित ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला असून, त्यातील रहस्यमय वातावरण आणि गुंतागुंतीच्या कथानकाने चित्रपटाबद्दल उत्सुकता निर्माण केली आहे. सस्पेन्स आणि क्राईम थ्रिलर हा चित्रपटप्रकार प्रेक्षकांना नेहमीच आकर्षित करत आला आहे. मात्र एखाद्या गुन्ह्याची कथा सांगताना त्यामागील मानसिकता, मानवी नाती, संशय आणि सत्याचे वेगवेगळे पैलू उलगडणे हेच अशा चित्रपटाचे खरे वैशिष्ट्य असते. 'मिरांडा वॉर्निंग' याच धाटणीचा एक वेगळा सिनेमॅटिक अनुभव घेऊन येत आहे. सतनाम फिल्म्स स्टुडिओ आणि ओपन गेट मुव्हीज मार्फत "मिरांडा वॉर्निंग" या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे. सचिन धोत्रे यांनी चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन केले आहे तर अल्ट्रा मीडिया एंटरटेनमेंटच्या सुशीलकुमार अग्रवाल आणि सुकल्प चित्रच्या कल्पक जोशी यांनी या चित्रपटाची प्रस्तुती केली आहे. सचिन धोत्रे यांनी चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन केले आहे. त्यांनी या पूर्वी २०२३मध्ये 'गेट-टुगेदर' या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं होतं. त्यानंतर 'मिरांडा वॉर्निंग' या चित्रपटातून त्यांनी वेगळा प्रयोग केला आहे.

विसापूर किल्ल्यावर जमिनीत गाडलेला ऐतिहासिक तोफगोळा सापडला

लोणावळा: दैनिक संध्या

गडभ्रमंती करत असताना गडावरील दारूगोळा कोठाराजवळ पर्यटकांना जमिनीतून थोडासा वर आलेला तोफगोळा नजरेस पडला. त्यानंतर सहजपणे खोदून तो तोफगोळा बाहेर काढण्यात आला व पुरातत्व विभागाकडे सुपूर्त करण्यात आला आहे. विसापूर किल्ल्यावर दारूगोळा कोठाराजवळ मंचाचे कार्याध्यक्ष सागर कुंभार यांच्या नजरेस तोफगोळा पडला. यानंतर त्यांनी याची माहिती पुरातत्व विभागाला दिली. तसेच, या विभागाचे कर्मचारी सुभाष दहिभाते, मच्छिंद्र वाघमारे, रोहित नगीने, हेमंत वाघमारे यांच्याकडे हा तोफगोळा सुपूर्द करण्यात आला आहे. याबाबतीत मंचातर्फे वेळोवेळी पुरातत्व विभागाला आवाहन करण्यात आले आहे.

गीतांतून उलगडला महात्मा फुले यांच्या प्रबोधनाचा वारसा

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या सहकार्याने शाहिरी जलशाचे आयोजन

■ पुणे (दै. संध्या)

शिक्षणातून माणसाला विचारांची दिशा मिळते आणि प्रबोधनातून समाजपरिवर्तनाचा मार्ग खुला होतो, हा महात्मा ज्योतिराव फुले यांनी दिलेला विचार आजही तितकाच महत्त्वाचा आहे. त्यांच्या याच विचारांचा वारसा शाहिरी गीतांच्या माध्यमातून नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न शाहिरी जलशातून करण्यात आला.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या सहकार्याने 'महात्मा ज्योतिबा - वारसा प्रबोधनाचा...' या संकल्पनेतून मंगळवार पेठेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, माळधक्का चौक येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दिव्यांग कल्याणकारी संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड. मुरलीधर कचरे, सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या अधीक्षक जान्हवी जानकर, माळी महासंघाचे अध्यक्ष दीपक जगताप आदी उपस्थित होते.

महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्त्रीशिक्षण, बहुजन समाजाचे शिक्षण, विधवा पुनर्विवाह, अस्पृश्यता निर्मूलन तसेच शेतकरी आणि कष्टकरी वर्गाच्या प्रश्नांसाठी आयुष्यभर संघर्ष केला. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन असल्याचा विचार त्यांनी कृतीतून मांडला. समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाचा त्यांनी दिलेला हा वारसा लोककला, शाहिरी आणि सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात आला.



कार्यक्रमाची प्रस्तावना संयोजक निलेश धायरकर यांनी केली. महापुरुषांचे विचार पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

शाहिरी जलशामध्ये युवा शाहीर श्रीकांत शिर्के, सामाजिक कार्यकर्ते संदीप मोरे, सुरेश पवार आणि सहकलाकारांनी विविध गीतांच्या माध्यमातून महात्मा फुले यांच्या विचारांचा जागर केला. पोवाडे, लोकगीते आणि प्रभावी सादरीकरणातून सामाजिक प्रबोधनाचा संदेश देण्यात आला.


कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्याणी रणसिंग यांनी केले, तर अक्षय मुळे यांनी आभार मानले.

सोमेश्वर संस्थानची ५० कोटींची जमीन कवडीमोल भावाने विकणारा

■ अमरावती (दै. संध्या)

येथील श्री सोमेश्वर महादेव संस्थानची ५० कोटी रुपये किमतीची १२ एकर मोक्याची शेतजमीन अवघ्या ९६० रुपयांत लाटण्याचा बेकायदेशीर आदेश देणारे तहसीलदार विजय लोखंडे यांना महसूल विभागाने निलंबित केले आहे. लोखंडे यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर करत, योग्य चौकशी न करता आणि साक्ष-पुरावे व उलट तपास न घेता अत्यंत घाईघाईने हा एकतर्फी निर्णय दिला होता. या अत्यंत गंभीर प्रशासकीय अनियमिततेची दखल घेत शासनाने त्यांना निलंबित केले असून त्यांच्यावर पुढील विभागीय चौकशीची कठोर कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे.

या प्रकरणाचे मूळ म्हणजे, सदर देवस्थानची जमीन मनपा हद्दीत असल्याने व संस्थानकडे कायदेशीर सूट प्रमाणपत्र असल्याने तेथे 'कुळ कायदा' लागूच होत नाही. असे असतानाही लोखंडे यांनी कुळ कायद्याचा बेकायदेशीर आधार घेत ही जमीन त्रयस्थ व्यक्तीच्या नावे करून, बिल्डर लॉबीच्या फायद्यासाठी



ती जाणीवपूर्वक 'वर्ग-१' (भोगवटदार) मध्येच ठेवली होती.

मात्र, महाराष्ट्र मंदिर महासंघ आणि संस्थानच्या विश्वस्तांनी तातडीने आक्षेप घेत ही जमीन 'वर्ग-२' केली व बिल्डर लॉबीला होणारे हस्तांतरण रोखले. महासंघाच्या या पाठपुराव्यामुळे उपविभागीय अधिकाऱ्यांनी (SDO) हा बेकायदेशीर खरेदी आदेश पूर्णतः रद्द केला असून सद्यस्थितीत देवस्थानची मालकी अबाधित आहे.

सोनी सबने आपली नवीन कौटुंबिक मनोरंजन मालिका 'लो चुडैल चली ससुराल' केली सादर

■ पुणे (दै. संध्या)

भारतातील आघाडीच्या हिंदी जनरल एंटरटेनमेंट चॅनेल्सपैकी एक असलेला सोनी सब आपल्या आगामी कौटुंबिक मनोरंजन मालिकेद्वारे लो चुडैल चली ससुराल प्रेक्षकांना एका धमाल प्रवासावर घेऊन जाण्यास सज्ज आहे. या मालिकेचा प्रीमियर 18 नोव्हेंबर रोजी रात्री 8 वाजता होणार आहे. ही मालिका जादू आणि विनोद यांचा ताजेतवाना मिलाफ सादर करत दैनंदिन आयुष्याला एक अनपेक्षित वळण देण्याचे आश्वासन देते. ऑप्टिमिस्टिक्स एंटरटेनमेंट इंडिया लिमिटेड निर्मित या मालिकेत हिबा नवाब, अधिक मेहता आणि राखी विजन प्रमुख भूमिकांमध्ये झळकणार आहेत.

हिबा नवाब उर्वशीची भूमिका साकारत आहे, जी एक गोड, दयाळू मनाची चुडैल आहे आणि जी अधिक मेहता साकारत असलेल्या आरव पटेलच्या प्रेमात आकंठ बुडते. स्वतःच्या मेहनतीने उभा राहिलेला व्यावसायिक आणि प्रेमावर मनापासून विश्वास



ठेवणारा आरव साधं आयुष्य जगण्यावर विश्वास ठेवतो आणि प्रामाणिकपणा, विश्वास तसेच अर्थपूर्ण नात्यांना जपतो. प्रेमासाठी उर्वशी तिचं जादुई जग मागे सोडून त्याच्यासोबत आयुष्य जगण्याचा निर्णय घेते, पण लवकरच तिला जाणवतं की एका मानवी कुटुंबात रुळणं काही सोपं नाही! आरवला आपल्या पत्नीची जादुई ओळख कळल्यानंतर त्याला आयुष्यातला सर्वात मोठा धक्का बसतो, तर उर्वशी रोजच्या आयुष्यातील प्रसंग हाताळण्यासाठी जादूचा वापर करण्याचा प्रयत्न करते आणि त्यामुळे त्यांच्या वैवाहिक आयुष्यात अनेक मजेशीर व अनपेक्षित घडामोडी घडतात. या धमाल कथेला आणखी रंगत आणते राखी विजन साकारत असलेली कमिनीची भूमिका. कमिनी ही उर्वशीची आई असून त्यांच्या गूढ जादुई विश्वातील सर्वात शक्तिशाली चुडैल्यांपैकी एक आहे. तिच्या उपस्थितीमुळे कथेत जादू आणि खोडकरपणाची आणखी भर पडते. अजय भालवणकर, चीफ कंटेंट ऑफिसर - सोनी सब, मूव्हीज, एफटीए आणि इन्फोटेनमेंट म्हणाले,"सोनी सबमध्ये आम्ही अशा कथा सादर करण्यावर विश्वास ठेवतो ज्या आनंद, सकारात्मकता आणि हास्य पसरवतात, तसेच कुटुंबांना एकत्र येण्याची संधी देतात. चुडैल चली ससुरालद्वारे आम्ही फॅन्टसी आणि विनोद यांचा एक ताजातवाना संगम प्रेक्षकांसमोर आणत आहोत, जो अनपेक्षित घटनांनी भरलेलं एक वेगळं विश्व निर्माण करतो. या मालिकेत आगळेवेगळे पात्र आणि मनोरंजक प्रसंग आहेत, जे प्रेक्षकांना खिळवून ठेवण्याचं आश्वासन देतात.

वैभवशाली हिंदुस्थानसाठी शिवरायांचे विचार गरजेचे

प.पू. स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज : 'राजर्षी शिवछत्रपती स्फूर्ती गाथा' सोहळ्याचे आयोजन

■ पुणे (दै. संध्या)

निश्चयाचा महामेरू, बहुत जनांसी आधारू, अखंड स्थितीचा निर्धारू, श्रीमंत योगी, असे आपण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करतो. रामायण आणि महाभारतातील सद्गुण जर एका ठिकाणी पाहायचे असतील, तर ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसतात. जगाला वंदनीय असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांचे आचार, विचार आणि कार्य हिंदुस्थानला आजही प्रेरणादायी आहेत. हिंदुस्थान खऱ्या अर्थाने सर्वांगीण वैभवशाली करायचा असेल, तर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांची आजही गरज आहे, असे मत श्री राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे महासचिव प.पू. स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांनी व्यक्त केले.

माहेश्वरी परिवार फाउंडेशन आणि समस्त माहेश्वरी समाज, पुणे यांच्या वतीने महालक्ष्मी लॉन्स येथे प.पू. स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांच्या'राजर्षी



शिवछत्रपती स्फूर्ती गाथा' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. फाउंडेशनचे अध्यक्ष के. सी. चांडक, स्वागताध्यक्ष वसंत राठी, सचिव सुनील बियाणी, सल्लागार शेखर मुंदडा, मुख्य प्रायोजक नितीन न्याती, मनोज झंवर, मनोज जाजू, राहुल नवंदर, मुरली सारडा, दीपक काबरा, चंदू मंत्री आदी यावेळी उपस्थित होते.

प.पू. स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज आणि संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांचे व्यक्तिमत्त्व आणि कार्य ज्या प्रमाणात आपण जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवायला हवे होते,

त्या प्रमाणात पोहोचवले गेले नाही. त्यासाठीच मी व्याख्यानांच्या माध्यमातून या दोन महान राष्ट्रपुरुषांचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांचे विचार लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करीत असतो. पुढील पिढी सक्षम घडवायची असेल, तर या महान पुरुषांचे विचार त्यांच्यापर्यंत पोहोचले पाहिजेत.

छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार आणि शिकवण आपण खरोखरच आपल्या आयुष्यात अंगीकारली आहे का, हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारला पाहिजे. महाराजांचे महान व्यक्तिमत्त्व आपण आदर्श मानतो; परंतु त्यांच्या गुणांवर आधारित आदर्शवत जीवन आपण खरोखरच जगत आहोत का, याचे आत्मपरीक्षण केले पाहिजे.

छत्रपती शिवाजी महाराज वंदनीय

इस्रायलपासून अमेरिकेपर्यंत आणि ऑस्ट्रेलियापासून चीनपर्यंत सर्व देशांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज वंदनीय मानले जातात. आपल्या मातीत इतका महान राष्ट्रपुरुष जन्माला आला, याबद्दल आपण स्वतःला भाग्यवान मानले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी कधीही केवळ स्वतःच्या कुटुंबासाठी, समाजासाठी अथवा जातीपुरते काम केले नाही, तर हिंदवी स्वराज्याची स्थापना आणि विश्वकल्याणाची भावना त्यांच्या कार्यातून कायम दिसून येते. त्यामुळेच त्यांचे कार्य आणि विचार काळाच्या कसोटीवर टिकून राहिले आहेत आणि यापुढेही हजारो वर्षे टिकून राहतील. हे विचार आपण विविध माध्यमांतून पुढील पिढीपर्यंत पोहोचवले पाहिजेत. पुढील पिढी संस्कारक्षम झाली, तरच खऱ्या अर्थाने वैभवशाली हिंदुस्थान घडविता येईल. छत्रपती शिवाजी महाराज यांचे व्यक्तिमत्त्व, विचार आणि कार्य यांचा आदर्श घेऊन ते प्रत्यक्ष जीवनात अंगीकारल्यास हे शक्य आहे, असेही प.पू. स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांनी सांगितले. वसंत राठी यांनी प्रास्ताविक केले. पंकज मानधने यांनी सूत्रसंचालन केले. व्याख्यानापूर्वी माहेश्वरी परिवार फाउंडेशन आणि समस्त माहेश्वरी समाज, पुणे यांच्या वतीने शोभायात्रा काढण्यात आली. १४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४ ते ७.३०, तसेच १५ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते १२.३० या वेळेत प.पू. स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांची व्याख्याने होणार आहेत. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला आहे.



श्रीमंत दगडूशेठ बाप्पाला श्री उमांगमलज जन्मोत्सवानिमित्त ११०० नारळांचा महानैवेद्य

■ पुणे (दै. संध्या)

गाणपत्य संप्रदायात कार्तिक शुद्ध चतुर्थी, श्री उमांगमलज जन्मोत्सवात मोरयाला नारळ समर्पित करण्याला विशेष महत्व आहे. त्यामुळे दगडूशेठ गणपती बाप्पाला ११०० नारळांचा महानैवेद्य दाखविण्यात आला.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे मंदिरात श्री उमांगमलज जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. पहाटे ३ वाजता ब्रह्मणस्पती सूक्त, पहाटे ४ ते सकाळी ६ दरम्यान गायक अभय जोधपूरकर यांचा स्वराभिषेकाचा गायनाचा कार्यक्रम झाला. सकाळी ८ वाजता गणेश याग देखील पार पडला. तसेच दुपारी सत्यविनायक पूजा देखील पार पडली. अंतःकरणातील अहंकार आणि ममत्वाचे मळभ दूर झाल्यानंतर शुद्ध, स्वच्छ प्रशांत स्वरूपातील जे परमात्म दर्शन घडते, त्यांना म्हणतात उमांगमलज. त्यामुळे नारळांची आरास व धार्मिक विधी यानिमित्ताने मंदिरामध्ये पार पडले. ट्रस्टचे अध्यक्ष महेश सूर्यवंशी म्हणाले, देवी पार्वतीने अंगावरच्या मळापासून एक पुतळा बनवला. त्याला जिवंत केले. पुढे त्याचे आणि शंकरांचे युद्ध झाले. भगवान शंकरांनी त्या मुलाचे मस्तक उडविले. देवी पार्वतीच्या संतापाला शांत करण्यासाठी शेवटी त्या बालकाच्या धडावर भगवान श्री विष्णूंनी आणलेले गज मस्तक बसविण्यात आले. त्यांना श्री गजानन असे म्हटले आहे. ही श्री गणेश जन्माची कथा आपण नेहमी ऐकतो ती या अवताराची कथा आहे. या अवतारात भगवान श्री गणेशांचे नाव आहे उमांगमलज. ते पुढे म्हणाले, उमा म्हणजे देवी पार्वती. तिच्या अंगावरील मळापासून ज म्हणजे जन्माला आलेला. असा याचा शब्दशः अर्थ. हा जशाला तसा लागू पडतच नाही. देवी पार्वतीच्या अंगावर पुतळा म्हणण्याइतका मळ असेल तरी कसा? तर लक्षात घ्यायला हवे की या सर्व कथा अध्यात्माचे निरूपण करण्यासाठीच असतात. आपली बुद्धी हीच पार्वती देवी आहे. तिच्यावर चढलेला अहंकार आणि ममत्वाचा थर हाच मळ आहे. हा अहंकार आणि ममत्व दूर झाले की ज्या मोरयांची प्राप्ती होते त्यांना उमांगमलज असे म्हणतात.






दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
रविवार, दि. १५ नोव्हेंबर २०२६

पुणे शहर व जिल्हा

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



थोडक्यात पण महत्वाचे



श्री मुक्ताई पतसंस्थेतर्फे सभासदांना दिवाळीनिमित्त भेटवस्तूंचे वाटप

नारायणगाव : दैनिक संध्या

मांजरवाडी येथील 'श्री मुक्ताई नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित' यांच्या वतीने संस्थेच्या सर्व सभासदांना भेटवस्तू देण्यात आल्या. या उपक्रमांतर्गत प्रत्येक सभासद बंधूला ५ लिटर जेमिनी तेलाच्या डब्याचे वाटप करण्यात आले. संस्थेचे संस्थापक दत्तात्रय खंडागळे आणि अध्यक्ष चंद्रशेखर जाधव यांनी याबद्दल माहिती दिली. या कार्यक्रमाप्रसंगी बोलताना संस्थेचे संस्थापक दत्तात्रय खंडागळे यांनी संस्थेच्या आर्थिक प्रगतीसाठी सर्व सभासदांनी जास्तीत जास्त ठेवी ठेवून सहकार्य करावे, असे आवाहन केले. या सोहळ्याला संस्थेचे संस्थापक दत्तात्रय खंडागळे, अध्यक्ष चंद्रशेखर जाधव, उपाध्यक्ष विलास खंडागळे, मंगेश मुळे,संतोष तांबे, मधुकर खोखराळे, एकनाथ डुकरे, अक्षय वाव्हळ,लक्ष्मण थोरात, खंडू मुळे, वैजयंती कोऱ्हाळे , निवृत्ती गटकळ, हरीश पोखरकर, गोविंद थोरात, संदीप म्हस्के ,सलीम मिस्तरी, उज्वल दहिवाळ, संजू कोऱ्हाळे, सुवर्णा मुळे, बाळासाहेब राजगुरू आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपाध्यक्ष विलास खंडागळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

UWA इंडियातर्फे मुंबईत 'MBA ॲडमिशन डे'चे आयोजन

■ कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), नैतिकता आणि व्यावसायिक नेतृत्व यांच्या भविष्याचा वेध

पुणे : दैनिक संध्या

युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया (UWA) इंडिया, आपल्या करिअरला प्रगत करू इच्छिणाऱ्या व्यावसायिकांसाठी एमबीए (MBA) कार्यक्रम अधिक बळकट करत आहे. हा एक वेगवान आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त व्यवस्थापन कार्यक्रम असून, यात शैक्षणिक सखोलतेसोबतच प्रत्यक्ष व्यावसायिक अनुभवाचाही समावेश आहे. एमबीएसाठी इच्छुक उमेदवारांशी संवाद साधण्याच्या उद्देशाने, UWA इंडिया १२ नोव्हेंबर २०२६ रोजी मुंबईत 'एमबीए ॲडमिशन डे' (MBA Admission Day) आयोजित करणार आहे. या कार्यक्रमात "एआय (AI) निर्णय घेऊ शकते, पण तसे करावे का? – नैतिकता, नेतृत्व आणि व्यवसायाचे भविष्य" (AI निर्णय घेऊ शकते, पण तिने तसे करावे का? नैतिकता, नेतृत्व आणि व्यवसायाचे भविष्य) या विषयावर एक संवादात्मक सत्र आयोजित केले जाईल. एक वर्षाचा पूर्णवेळ एमबीए (MBA) कार्यक्रम समकालीन व्यवस्थापन शिक्षण, उद्योगांशी संवाद आणि कृत्रिम बुद्धिमत्तेसह (AI) उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष व्यावसायिक वातावरणात कसा वापर करता येईल, हे शोधण्याच्या संधी एकत्र आणतो. धोरणात्मक क्षमता विकसित करू पाहणाऱ्या आणि नेतृत्वाची अधिक मोठी जबाबदारी स्वीकारण्यास इच्छुक असलेल्या व्यावसायिकांसाठी हा कार्यक्रम तयार करण्यात आला आहे. यात डेटावर आधारित निर्णयक्षमता, उद्योजकता आणि नाविन्य, धोरणात्मक व्यवस्थापन, आंतरराष्ट्रीय व्यवसाय आणि संघटनात्मक परिवर्तन यांसारख्या महत्त्वाच्या विषयांचा समावेश आहे. या कार्यक्रमाचे स्वरूप वेगवान (accelerated) असल्याने, विद्यार्थ्यांना कमी कालावधीत जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त ऑस्ट्रेलियन एमबीए पदवी मिळवण्याची संधी मिळते. युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया (UWA) इंडिया – मुंबईच्या अंतरिम प्रो-व्हाइस चान्सलर, नशीद चौधरी म्हणाल्या: "भविष्य अशा नेत्यांचे आहे जे तंत्रज्ञान, नाविन्य (इनोव्हेशन) आणि व्यावसायिक धोरण यांची सांगड घालू शकतात. UWA चा MBA कार्यक्रम याच भविष्याचा विचार करून तयार करण्यात आला आहे. यात जागतिक दर्जाचे अध्यापन, उद्योगांशी थेट संबंध आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) व्यावहारिक कौशल्यांचा विकास यांचा समावेश आहे. हा कार्यक्रम अशा प्रकारे आखला गेला आहे की, तो नोकरी करणाऱ्या व्यावसायिकांच्या गरजा पूर्ण करतो. महाराष्ट्रात कॅम्पस असलेली एकमेव ऑस्ट्रेलियन विद्यापीठ संस्था म्हणून, आम्ही UWA ची जागतिक व्याप्ती वाढवत आहोत, तसेच विद्यार्थ्यांना जगातील अत्यंत गतिमान व्यावसायिक परिसंस्थांपैकी एकाशी थेट जोडले जाण्याची संधी देत आहोत. महाराष्ट्र आणि तामिळनाडूमध्ये आमची उपस्थिती ही भारत आणि वेस्टर्न ऑस्ट्रेलिया यांच्यातील भविष्यातील संबंधांप्रती असलेल्या आमच्या दृढ वचनबद्धतेचे प्रतीक आहे. हे अनेक दशकांच्या परस्पर सहकार्याचा पाया असून, शिक्षण हे आर्थिक, संशोधनविषयक आणि मानवी संबंध अधिक दृढ करण्यासाठी एक प्रभावी माध्यम आहे, या आमच्या विश्वासाचे प्रतिबिंब आहे. आमच्या विद्यार्थ्यांसाठी, हा कार्यक्रम नवीन नेटवर्क, नवीन बाजारपेठा आणि नवीन संधींची दारे उघडतो; ज्यामुळे ते सीमापार नेतृत्व करण्यास आणि अधिक परस्परसंबंधित होत चाललेल्या जगात यशस्वी होण्यास सज्ज होतात."


गरजूंच्या चेहऱ्यावर फुलविला आनंद

नारायणगाव : दैनिक संध्या

दिवाळीचा आनंद समाजातील प्रत्येक घटकाला मिळावा, तसेच निराधार, वयोवृद्ध आणि गरजू व्यक्तींची दिवाळीही आनंदात साजरी व्हावी, या सामाजिक भावनेतून लायन्स क्लब ऑफ जुन्नर शिवनेरीच्या वतीने आळे येथील अन्नपूर्णा प्रतिष्ठानमध्ये दिवाळी फराळ व अन्नदान उपक्रम राबविण्यात आला. लायन्स क्लबचे अध्यक्ष सचिन जंगम यांच्या मातोश्री उषा विजय जंगम यांच्या पुढाकारातून पाडव्याच्या निमित्ताने अन्नपूर्णा प्रतिष्ठानमध्ये आधार घेणाऱ्या निराधार व गरजू व्यक्तींना दोन वेळच्या जेवणाचे डबे तसेच दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. समाजातील गरजू व्यक्तींच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. "अन्नपूर्णा प्रतिष्ठानच्या सेवाभावी कार्याला हातभार लावण्याचा हा एक छोटासा प्रयत्न आहे. गरजूंच्या चेहऱ्यावरील समाधानाचे हास्य आणि त्यांचे आशीर्वाद हीच आमच्यासाठी सर्वात मोठी दिवाळी भेट आहे," अशी भावना अध्यक्ष सचिन जंगम यांनी याप्रसंगी व्यक्त केली. या उपक्रमासाठी लायन्स क्लब ऑफ जुन्नर शिवनेरीचे अध्यक्ष सचिन जंगम, सेक्रेटरी डॉ. विलास नायकोडी, खजिनदार सचिन भोर यांच्यासह क्लबचे पदाधिकारी व सभासदांनी परिश्रम घेतले.

मुलांकडून तरुणावर कोयत्याने हल्ला

राजगुरुनगर : दैनिक संध्या



तीन अल्पवयीन मुलांकडून एका २६ वर्षीय तरुणावर कोयत्याने वार करून जीवघेणा हल्ला करण्यात आला.ही घटना खेड तालुक्यातील सांडभोर वाडी हद्दीतील तिन्हेवाडी रोडवर मंगळवारी दुपारी घडली. या हल्ल्यात शिवम बाळासाहेब करमारे वय २६राहणार (आरुडे वाडी) हा तरुण गंभीररीत्या जखमी झाला असून खेड पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांची रवानगी सुधारगृहात करण्यात आली आहे. या प्रकरणीआदित्य काळुराम करमारे वय २४ रा. पाचारणे वाडी यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सांडभोर वाडी हद्दीतील तिन्हेवाडी रस्त्यावर मंगळवारी दुपारी पावणेतीनच्या सुमारास अज्ञात कारणावरून तीन अल्पवयीन मुलांनी शिवम करमारे याच्या डोक्यावर,हातावर,छातीवर कोयत्याने असंख्य वार करून आरोपी पळून गेले होते.

एकत्रीकरणात सौरपंपांना प्राधान्य



■ पुणे (दै. संध्या)

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत राबविण्यात येणाऱ्या तीन स्वतंत्र योजनांचे आता एकाच योजनेत एकत्रीकरण करण्यात येणार आहे. या योजनांच्या एकत्रीकरणात सौरपंपांना प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच, पाणीपुरवठा योजनांचे जलस्रोत शाश्वत करण्याबरोबरच भूजल पुनर्भरण, सौरऊर्जेवर आधारित पंप बसविणे आणि नादुरुस्त हातपंप आणि विद्युतपंपांची देखभाल-दुरुस्ती अशा उपाययोजनांचा नव्या एकत्रित योजनेत समावेश करण्यात आला आहे. पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय जाहीर केला आहे. त्यानुसार शासकीय प्रक्रिया पुनर्रचना उपक्रमांतर्गत योजनांचे सुलभीकरण आणि एकत्रीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय शासकीय प्रक्रिया पुनर्रचना समितीने ऑक्टोबर महिन्यात झालेल्या बैठकीत या प्रस्तावाला मान्यता दिली आहे.जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडून तीन स्वतंत्र योजना राबविल्या जात होत्या. यामध्ये नलिका विहिरींद्वारे पाणीपुरवठा आणि जलभरण स्त्रोतांचे बळकटीकरण, विंधन विहिरी आणि कूपनलिकांवर विद्युतपंप बसविणे तसेच हातपंपांचे विद्युतपंपांमध्ये रूपांतर करणे आणि हातपंप तसेच विद्युतपंपांची देखभाल-दुरुस्ती या योजनांचा समावेश होता. मात्र, या स्वतंत्र योजनांमुळे ग्रामपंचायतींना विद्युतपंपांची वीजबिले भरणे आर्थिकदृष्ट्या अडचणीचे ठरत असल्याने अनेक ठिकाणी वीज देयकांची थकबाकी वाढत असल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे विद्युतपंपांऐवजी सौरऊर्जेचा वापर करण्यावर भर देण्याची सूचना करण्यात आली होती. नव्या एकत्रित जिल्हा वार्षिक (सर्वसाधारण) योजनेत भूजल पुनर्भरण, सौरपंप बसविणे, सध्याच्या विद्युतपंपांचे सौरपंपांमध्ये रूपांतर करणे आणि नादुरुस्त पंपांची देखभाल आणि दुरुस्ती केली जाणार आहे. याशिवाय भूजल पातळी वाढविण्यासाठी आवश्यक असलेल्या अन्य उपाययोजनाही राबविण्यात येणार आहेत.



वाहतुकीस अडथळे ठरणारे बंद टोल नाके हटवावेत

■ मोशी (दै. संध्या)

पुणे नाशिक रस्त्यावर मोशी आणि राजगुरुनगर येथील टोलनाके बंद करून बराच कालावधी उलटला आहे. मात्र तरीही येथील टोल नाक्यांचे सांगाडे अद्यापही हलवले नसल्याने नागरिकांना त्रासदायक होत आहेत. या परिसरात मोठ्या प्रमाणावर नागरी वस्ती, औद्योगिक वसाहती, जड वाहनांची वाहतूक याशिवाय देहू आळंदी या तीर्थस्थळांकडे जाणारी मोठी वाहतूक आहे. सतत वर्दळीची अव्यात वाहतूक सुरू असल्याने वाहतुकीस हे बंद टोलनाके अडथळा होत आहेत. याशिवाय टोल नाक्यांच्या परिसरात कसलेही सुरक्षाविषयक उपाययोजना केल्या नसल्याने रात्रीच्या वेळी वाहने धडकून अपघात होऊ शकतो. महामार्ग प्रशासनाने हे दोन्ही बंद टोलनाके त्वरित हटवून वाहतुकीचा अडथळा दूर करावा. याशिवाय टोल नाके हलवल्यानंतर महामार्गाची दुरुस्ती करून महामार्ग वाहतूक योग्य करावा अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

श्रीकृष्ण सेवा महानुभाव आश्रमाचा वर्धापनदिन महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न

■ कोरेगावमुळ (दै. संध्या)

धार्मिक परंपरा, अध्यात्मिक विचारांची जपणूक आणि समाजामध्ये भक्तिभाव व एकात्मतेची भावना वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा वर्धापनदिन महोत्सव परिसरातील भाविकांसाठी श्रद्धा, भक्ती आणि आनंदाची पर्वणी ठरत असल्याचे मत महंत सैंगराज दादाजी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना व्यक्त केले. श्री पंचकृष्णांच्या असीम कृपेने मळद येथील श्रीकृष्ण सेवा महानुभाव आश्रमाचा वर्धापनदिन महोत्सव मोठ्या धार्मिक उत्साहात साजरा होत आहे. आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवाला धार्मिक, आध्यात्मिक, आचार्य, संत महंत, तपस्विनी, सदभक्त नामधारक उपस्थित होते. महोत्सवानिमित्त पहाटे श्रीमूर्ती मंगलस्नान, सकाळी गीतापाठ व सूत्रपाठ पारायण, ध्वजारोहण, धर्मसभा, दुपारी १२.३० वा. श्री पंचावतार उपहार महोत्सव, तर दुपारी १ वा. महाप्रसाद अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे आयोजन प.पू.प.म.रामेश्वरव्यास बाबा कारंजेकर, तपस्विनी कुंदाताई कपाटे, दिपाताई कपाटे, रुपाताई कपाटे यांनी केले. याप्रसंगी महंत खंदारकर बाबाजी, महंत विश्वनाथ कारंजेकर, महंत विश्वनाथ कपाटे, तपस्विनी दमयंती आराध्य, लिलाबाई पुणेकर, महंत साधेराजव्यास धाराशिवकर, बबनराव शिंदे, राजेंद्र खेडेकर, तानाजी काटे, हरिभाऊ कांचन, अशोक सावंत, विठ्ठल कोलते, संजय चौधरी, सुरज बोधे, राजेंद्र घुले, आबा मुरकुटे, भाऊसाहेब कांचन, गुलाब दिघे, रामदास भोसले, मुरलीधर पवार, बबनराव कटके, टिळेकरवाडी भजनी मंडळ आदी सदभक्त, ग्रामस्थ, भाविक, बालगोपाल, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन महंत संदिपराज शास्त्री यांनी केले.

दुधाच्या दरात प्रतिलिटर चार रुपयांची वाढ

दूध उत्पादक आणि प्रक्रिया व्यावसायिक कल्याणकारी संघाच्या बैठकीत निर्णय

■ पुणे (दै. संध्या)

गेल्या काही दिवसांपासून डिझेलच्या दरातील वाढीबरोबरच वाहतूक, साखर, पॅकिंग आणि मनुष्यबळाच्या खर्चात झालेल्या वाढीमुळे गाय आणि म्हशीच्या दूध दरात प्रतिलिटर चार रुपयांची वाढ करण्याचा निर्णय दूध उत्पादक आणि प्रक्रिया व्यावसायिक कल्याणकारी संघाच्या बैठकीत घेण्यात आला. दरवाढीची अंमलबजावणी येत्या सोमवारपासून (१६ नोव्हेंबर) होणार आहे. या दरवाढीमुळे वाढत्या उत्पादन, पॅकिंग, वाहतूक आणि अनुषंगिक खर्चाचा समतोल साधण्यास मदत होईल. तसेच, दूध उत्पादकांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य मोबदला मिळेल, असा दावा करण्यात आला आहे.

पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक आणि प्रक्रिया व्यावसायिक कल्याणकारी संघाची बैठक शुक्रवारी पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघात (कात्रज डेअरी) अध्यक्ष गोपाळराव म्हस्के यांच्या उपस्थितीमध्ये झाली. या बैठकीस राज्यातील प्रमुख सहकारी आणि खासगी संघाचे पन्नास प्रतिनिधी उपस्थित होते. पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाचे चेअरमन अरुण चांभारे या वेळी उपस्थित होते.गेल्या काही काळात डिझेलच्या दरात वाढ झाली असून, दूध वाहतुकीचा खर्चही वाढला आहे. त्याचबरोबर साखरेचे दर आणि पॅकिंग साहित्य आणि मनुष्यबळावरील खर्चातही वाढ झाली आहे. दूध खरेदी दरातही वाढ झाली असून ही वाढ आणखी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे गाय आणि म्हशीच्या दूधाच्या दरात प्रतिलिटर चार रुपयांची वाढ तसेच दुग्धजन्य पदार्थांमध्ये दहा टक्क्यांपर्यंतची वाढ करण्यात येणार असल्याचे कल्याणकारी संघाने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.



देवदासी भगिनींच्या आयुष्यात आनंदाची भाऊबीज

■ विश्व हिंदू परिषदेच्या वतीने बुधवार पेठेत आपुलकीचा उपक्रम

■ दुष्काळग्रस्त भागातील महिलांनाही धान्य किटचे वाटप

■ पुणे (दै. संध्या)



भाऊबीज हा बहीण-भावाच्या प्रेमाचे आणि जिव्हाळ्याचे नाते जपणारा सण. याच सणाचे औचित्य साधून विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांत कसबा भागाच्या वतीने बुधवार पेठेतील देवदासी भगिनी आणि वेश्याव्यवसायात कार्यरत महिलांसोबत भाऊबीज साजरी करण्यात आली. या वेळी महिलांना धान्य, मिठाई आणि साडीचोळी यांसह १२ जीवनावश्यक वस्तूंचा संच भेट देण्यात आला. तसेच दुष्काळग्रस्त भागातील महिलांनाही धान्य किटचे वाटप करून दिवाळीचा आनंद त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यात आला. बुधवार पेठेतील नामदेव शिंपी कार्यालय येथे आयोजित या कार्यक्रमाला मुंबई क्षेत्राचे क्षेत्रीय धार्मिक प्रमुख संजय मुदराळे, किशोर चव्हाण, शैलेश जाधव, नामदेव शिंपी कार्यालयाचे अध्यक्ष बाळासाहेब लखामदे आदी उपस्थित होते. यावेळी संजय मुदराळे म्हणाले, गरजू व्यक्तींना मदत करणे हे आमचे सामाजिक कर्तव्य आहे. दिवाळीत लावलेली पणती कोणताही भेदभाव न करता सर्वांना समान प्रकाश देते. याच भावनेतून विश्व हिंदू परिषद समाजातील गरजू घटकांपर्यंत पोहोचून विविध सेवा उपक्रम राबवत आहे. देवदासी भगिनींच्या आयुष्यात अनेक सामाजिक आणि आर्थिक आव्हाने आहेत. स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी त्यांना दररोज संघर्ष करावा लागतो. त्यांच्या संघर्षाची जाणीव ठेवून त्यांना सन्मान, आपुलकी आणि आधार देण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला आहे. ते पुढे म्हणाले, दुष्काळग्रस्त भागातील महिलांसोबतही भाऊबीज साजरी करण्यात आली. इंद्र फाउंडेशन ट्रस्ट मुंबई यांच्या माध्यमातून जत, आटपाडी, कवठेमहांकाळ आणि शेवगाव या भागांतील महिलांना एकूण १,००० धान्य किटचे वाटप करण्यात आले. या किटमध्ये रवा, मैदा, साखर, बेसन यांसह १२ जीवनावश्यक वस्तू आणि दिवाळीचा फराळ देण्यात आला. किशोर चव्हाण म्हणाले, दिवाळीचा आनंद आपल्या घरापुरता मर्यादित न राहता समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. महिलांना आरोग्य, सुरक्षितता आणि सामाजिक स्तरावर अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. महिलांना सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक आधार आणि पाठबळ देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. विश्व हिंदू परिषद या महिलांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे.

पुण्यातील वेताळ टेकडी परिसरात पक्ष्यांच्या किती प्रजाती?

■ पुणे (दै. संध्या)



वृक्षराजीने संपन्न असलेल्या वेताळ टेकडी परिसरात पक्ष्यांच्या १७५ प्रजातींची नोंद झाली आहे. शहरात, टेकडी परिसरात सहसा न दिसणाऱ्या पक्ष्यांच्या प्रजाती, स्थलांतरित पक्षी टेकडी परिसरात आढळल्याची निरीक्षणे नोंदवण्यात आली असून, या उपक्रमातून टेकडी परिसरातील जैवविविधता अधोरेखित झाली आहे. राज्यातील पक्षी सप्ताहाच्या औचित्याने वेताळ टेकडी बचाव कृती समितीच्या पुढाकारातून ५ ते १२ नोव्हेंबर या कालावधीत पक्षी निरीक्षण उपक्रम (वेताळ टेकडी बर्डिंग मॅरेथॉन) राबवण्यात आला. या उपक्रमात अनुभवी ते हौशी अशा ६० पक्षी निरीक्षकांनी सहभाग घेतला. वेताळ टेकडीवरील झुडपे, जंगल, डोंगराळ भाग हा स्थानिक, स्थलांतरित पक्ष्यांसाठी महत्त्वाचा अधिवास आहे. या पूर्वी या परिसरात २८० हून अधिक पक्षी प्रजाती नोंदवण्यात आल्या आहेत. तर उपक्रमातील या आठ दिवसांत सुमारे ३५० तास पक्षीनिरीक्षण करून काळी घार, खंड्या, पोपट, टिटवी, बगळा अशा सुमारे १७५ प्रजातींची नोंद झाली आहे. २०२३मध्ये सुरू झालेल्या या उपक्रमाचे यंदा चौथे वर्ष होते. वेताळ टेकडी बचाव कृती समितीचे सदस्य, उपक्रमाचे आयोजक रणजित राणे म्हणाले, 'या उपक्रमातून काही निरीक्षणे नोंदवण्यात आली आहेत. युरोपीयन रोलर, कॉमन कूक अशा स्थलांतरित पक्ष्यांच्या प्रजाती टेकडीवर आढळून आल्या. शहरात सहसा न दिसणाऱ्या रेड नेक फाल्कनसारखे पक्षी टेकडीवर दिसले, तसेच टेकडीवर दिसत नाही, असा आजवर समज असलेल्या प्रजातीही नोंदवल्या गेल्या. त्यामुळे या उपक्रमातून टेकडीवरील पक्ष्यांची विविधता अधोरेखित झाली आहे.' 'पक्षी निरीक्षणासारख्या उपक्रमातून नागरिकांना टेकडीवरील नेहमीच्या वाटांपलीकडे जाऊन टेकडी अनुभवण्याची, निसर्गाशी जोडले जाण्याची संधी मिळते. वेताळ टेकडीचा परिसर म्हणजे केवळ मोकळी जागा किंवा फिरण्याचे ठिकाण नाही, तर विविध प्रकारच्या जिवांना आधार देणारी एक जिवंत नैसर्गिक परिसंस्था आहे,' असे राणे यांनी नमूद केले.

कृष्णा नाईक यांची मोशीतील 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण'ला भेट!

भारत, नेपाळ आणि भूतानमध्ये पायी भ्रमंती करणाऱ्या योग अभ्यासकाचा मोशीत सत्कार

■ पिंपरी-चिंचवड (दै. संध्या)

भारत, नेपाळ आणि भूतानमध्ये सुमारे २३ हजार किलोमीटरचा पायी प्रवास करणारे म्हैसूरचे ३० वर्षीय योग अभ्यासक कृष्णा नाईक यांनी शनिवारी मोशीतील 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण'ला भेट दिली. यावेळी त्यांनी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या पूर्णाकृती शिल्पाचे पूजन करून महाराजांच्या चरणी नमन केले. मोशीतील तपोवन भूमीत श्री नागेश्वर महाराजांच्या नंदादीपाचेही त्यांनी दर्शन घेतले. या भेटीदरम्यान आमदार महेश लांडगे यांच्या सहकाऱ्यांनी नाईक यांच्याशी त्यांच्या पदयात्रेतील अनुभव आणि पुढील योजनांबाबत संवाद साधला. "या प्रवासात अनेक चढ-उतार आले. प्रत्येक आव्हानातून नवा मार्ग शोधण्याची सवय लागली," असे नाईक यांनी सांगितले. प्रवासात भेटलेली माणसे, वेगवेगळ्या प्रदेशांत आलेले अनुभव आणि त्यातून मिळालेली शिकवण पुस्तकातून मांडण्याचा नाईक यांचा मानस आहे. पदयात्रा पूर्ण झाल्यानंतर या प्रवासावरील माहितीपट प्रदर्शित करण्याचीही त्यांची योजना आहे. यासोबतच योग विषयात पीएच. डी. करण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली. मोशी सायकलिस्ट ग्रुपच्या सदस्यांसह युवा उद्योजक नितीन घिगे, चेअरमन राहुल सस्ते, गणेश गुरव, सचिन वहिले, विशाल टेकाळे, तुषार सस्ते, दत्तात्रय सस्ते आणि स्वप्नील भुमकर आदींच्या हस्ते नाईक यांचा शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी त्यांना पुढील पदयात्रेसाठी शुभेच्छा दिल्या.

